मुंबई विद्यापीठ

# UNIVERSITY OF MUMBAI

***Re-ACCREDITED WITH 'A' GRADE BY NAAC***

दिनांक २१ व २२ मार्च, २०१३ रोजी झालेल्या
अधिसभेच्या वार्षिक सभेचे इतिवृत्त.

Minutes of the Annual Meeting of the Senate
held on
21st & 22nd March, 2013.

# मुंबई विद्यापीठ

मसुदा
क्र.२-२०१२-२०१३

अधिसभा
२१ आणि २२ मार्च, २०१३

अधिसभेची वार्षिक सभा विद्यापीठाचे सर कावसजी जहांगीर सभागृह (दीक्षान्त सभागृह), येथे गुरूवार दिनांक २१ मार्च, २०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता सुरू झाली. तसेच सदर सभा शुक्रवार, दिनांक २२ मार्च, २०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता पुन्हा सुरू झाली. सभेमध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते -

| | | २१ मार्च | २२ मार्च |
|---|---|---|---|
| १. | डॉ. राजन वेळूकर (कुलगुरू) | P | P |
| २. | डॉ. नरेश चंद्र (प्र-कुलगुरू) | P | P |
| ३. | प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे | P | P |
| ४. | डॉ. मृदुल जगन्नाथ निळे | P | P |
| ५. | श्री. भुजंग किसनराव अहिरे | P | P |
| ६. | डॉ. दिलिप शंकरराव पाटील | P | P |
| ७. | प्राचार्य (डॉ.) रविंद्रन कर्वाडी | P | P |
| ८. | प्राचार्या (श्रीमती) मंजुळा जेठानंद निचाणी | P | P |
| ९. | प्राचार्य नारायण मधुकर राजाध्यक्ष | P | P |
| १०. | प्राचार्य मारोती तुळशिराम भगत | P | A |
| ११. | प्राचार्य दिलिप गंभीर चोरसे | P | P |
| १२. | प्राचार्य (श्रीमती) ॲन्सी जोस | P | P |
| १३. | प्राचार्य (डॉ.) दत्ताजीराव यशवंतराव पाटील | P | P |
| १४. | प्राचार्य (डॉ.) कृष्णा अप्पया पाटील | P | P |
| १५. | प्राचार्य विठ्ठल बळीराम रोकडे | P | A |

| | | | |
|---|---|---|---|
| १६. | प्राचार्या (श्रीमती) कमला बालसुब्रमन्यम् | P | P |
| १७. | प्राचार्या (श्रीमती) हर्षा कमलेश मेहता | P | P |
| १८. | प्राचार्या (श्रीमती) प्रमिला श्रीकांत राऊत | P | P |
| १९. | प्राचार्य (डॉ.) सिद्धेश्वर तुकाराम गडदे | P | P |
| २०. | श्री. हसमुख देवजी रांभीया | P | P |
| २१. | श्री. महेश काशिनाथ म्हात्रे | P | P |
| २२. | श्री. वसंतरावजी गणेशमल ओस्वाल | P | A |
| २३. | श्री. संजय बाबुराव शेटे | P | P |
| २४. | श्री. भिकू रामजी इदाते | P | A |
| २५. | श्री. अक्षय प्रकाश पुजारे | P | A |
| २६. | कु. रेश्मा चंद्रकांत पाटील | P | P |
| २७. | श्री. कुमार खैरे (सचिव) | P | P |
| २८. | डॉ.(श्रीमती) मोहसिना मुकादम | P | P |
| २९. | डॉ. जालिंदर अडसुळे | P | P |
| ३०. | डॉ. आद्याप्रसाद पांडये | P | P |
| ३१. | डॉ. (श्रीमती) मधू सुधीर परांजपे | P | P |
| ३२. | डॉ.(श्रीमती) संगीता अतुल गोडबोले | P | P |
| ३३. | डॉ. बिंदूप्रकाश बेचन मिश्रा | P | P |
| ३४. | डॉ. संजय कुमार | P | P |
| ३५. | डॉ. (श्रीमती) अनुराधा संदीप मझुमदार | P | P |
| ३६. | डॉ. विवेक बळवंतराव देशमुख | P | P |
| ३७. | डॉ. अभय नामदेवराव वांबोले | P | P |
| ३८. | डॉ. (श्रीमती) सुनिता दशरथ खारीवाल | P | P |
| ३९. | डॉ. प्रल्हाद गंगाराम पवार | P | P |
| ४०. | डॉ. दिपक गंगाधरराव बीडवई | P | P |
| ४१. | डॉ. (श्रीमती) माधवी सुधीर निकम | P | P |

| | | | |
|---|---|---|---|
| ४२. | डॉ. (श्रीमती) आरती प्रसाद | P | P |
| ४३. | डॉ.(श्रीमती) अनुपमा जयवंत सावंत | P | P |
| ४४. | डॉ. वसंत सिताराम शेकडे | P | P |
| ४५. | डॉ. विजय नामदेव पवार | P | P |
| ४६. | श्री. गजानन (उर्फ) दिलीप अंबाजी करंडे | P | P |
| ४७. | श्री. महादेव बाबुराव जगताप | P | P |
| ४८. | श्री. प्रदीप बाळकृष्ण सावंत | P | P |
| ४९. | श्री. गणेश सदाशिव चव्हाण | P | P |
| ५०. | श्रीमती निलिमा नंदकुमार भुर्के | P | A |
| ५१. | श्री. संजय तुळशीराम वैराळ | P | P |
| ५२. | श्री. तुषार व्यंकटराव कुमारे | P | A |
| ५३. | श्री. शशिकांत काशिनाथ झोरे | P | P |
| ५४. | श्री. राजन वसंत कोळंबेकर | P | P |
| ५५. | प्राचार्य मुरलीधर गोविंदराव चांदेकर | P | P |
| ५६. | प्रा. अंबादास येलोजी मोहिते | P | P |
| ५७. | श्री. प्रकाश विठ्ठल पागे | P | A |
| ५८. | श्री. सलीम बापुमिया पटेल | P | P |
| ५९. | प्रा.(श्रीमती) रुपा शहा | P | A |
| ६०. | डॉ. राजन मोरेश्वर तुंगारे | P | P |
| ६१. | डॉ. उदय साळुंखे | P | A |
| ६२. | डॉ. (श्रीमती) शुभदा अविनाश जोशी | P | P |
| ६४. | डॉ. (श्रीमती) कविता रामचंद्र लघाटे | P | P |
| ६५. | डॉ. प्रल्हाद गंगाराम जोगदंड | P | A |
| ६६. | डॉ. (श्रीमती) माधुरी किरण पेजावर | P | P |
| ६७. | डॉ. सुरेश किसनराव उकरंडे | P | P |
| ६८. | प्राचार्य (डॉ.) टी. पी. मधू नायर | P | P |

| | | |
|---|---|---|
| ६९. श्री. दिलीप दगडू पवार | P | P |
| ७०. डॉ. किरण विष्णू माणगांवकर | A | P |
| ७१. डॉ. बाळकृष्ण विठ्ठल भोसले | P | A |
| ७२. डॉ. गंगाधर आसाराम मेश्राम | P | P |
| ७३. डॉ. (श्रीमती) सुनिता विठ्ठलराव मगरे | P | P |
| ७४. डॉ. (श्रीमती) शेफाली रसेंद्रा पंडया | P | P |
| ७५. डॉ. रामभाऊ महादू बडोदे | P | P |

सभेची सुरूवात 'वंदे मातरम्' या गीताने झाली.

अधिसभेच्या कामकाजाला सुरूवात करताना मा. कुलगुरूंनी स्वतःच्या तसेच विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने उपस्थित असलेल्या सन्माननीय सदस्यांचे हार्दिक स्वागत केले.

अधिसभेच्या नविन सदस्यांचे विद्यापीठातर्फे व अधिसभा सदस्यांतर्फे स्वागत करण्यात आले. मुंबई विद्यापीठाच्या विद्यापीठ ग्रंथालयाच्या ग्रंथपाल पदी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम २५(२)(आय) अन्वये श्री. भुजंग किसनराव अहिरे, कुलगुरूंनी नामनिर्देशित केलेल्या, प्र-पाठकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या, विद्यापीठ विभागांच्या किंवा विद्यापीठ परिसंस्थाच्या प्रमुखांमधील तीन व्यक्ती पदांच्या एका पदी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम २५(२)(यु) अन्वये डॉ. (श्रीमती) कविता रामचंद्र लघाटे, विद्यापीठाच्या विद्यार्थी परिषदेच्या अध्यक्षपदी निवडून आल्याने, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम २५(२)(एन) अन्वये अधिसभेचे पदसिध्द सदस्य झाल्याबाबत श्री. अक्षय प्रकाश पुजारे व मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी परिषदेच्या सचिवपदी निवडून आल्याने, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम २५(२)(एन) अन्वये अधिसभेच्या पदसिध्द सदस्या झाल्याबाबत कु. रेश्मा चंद्रकांत पाटील या सर्व सदस्यांचे विद्यापीठ प्रशासनातर्फे व अधिसभेतर्फे अभिनंदन.

यांनतर कुलसचिव म्हणाले की, श्री. सुधाकर शंकर तांबोळी, डॉ. (श्रीमती) चैताली तापस चक्रवर्ती, प्राचार्य सुधीर रामचंद्र भोसले व श्रीमती कवल अजय वर्मा यांनी कळविले आहे की, ते या सभेस उपस्थित राहू शकणार नाहीत आणि त्यांना या सभेत अनुपस्थित राहण्यास परवानगी द्यावी, अशी त्यांनी विनंती केली आहे.

अधिसभेने श्री. सुधाकर शंकर तांबोळी, डॉ.(श्रीमती) चैताली तापस चक्रवर्ती, प्राचार्य सुधीर रामचंद्र भोसले व श्रीमती कवल अजय वर्मा या सन्माननीय सदस्यांची अधिसभेस अनुपस्थित राहण्याची विनंती मान्य केली.

त्यानंतर कुलसचिवांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, आचार्य पार्वतीकुमार, श्री. इंद्रकुमार गुजराल, डॉ. शरदचंद्र गोखले, श्रीमती ज्योत्स्ना देवधर, श्री. म. वि. तथा मामासाहेब कौंडिण्य, ॲड. एम. पी. वशी, श्री. दत्ताजी नलावडे, श्री. मुकुंदराव किर्लोस्कर यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक व्यक्त करून त्यांना पुढील शब्दात श्रध्दांजली वाहिली.

## शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे

गेली चार दशके महाराष्ट्राच्या राजकारणावर दीर्घकाळ छाप उमटविलेले व लाखो शिवसैनिकांचे पंचप्राण असलेले शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे दि. १७ नोव्हेंबर, २०१२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८६ वर्षांचे होते. आपल्या कुंचल्यांनी 'मार्मिक' या नियतकालिकातून भल्याभल्यांची भंबेरी उडविणारे तसेच आपल्या दमदार नेतृत्वाने व प्रखर भूमिकेने राजकीय जीवनात कार्य करण्याची संधी हजारो-लाखोंना मिळवून देणारे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे एकमेव नेते होते.

## आचार्य पार्वतीकुमार

भारतीय शास्त्रीय नृत्याला जागतिक स्तरावर नावलौकिक मिळवून देणारे दिग्गज नृत्य दिग्दर्शक, नृत्य गुरू व भारतीय नृत्याचे अभ्यासक आचार्य पार्वतीकुमार यांचे दि. २९ नोव्हेंबर, २०१२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९४ वर्षांचे होते. त्यांना अखिल भारतीय नाटय परिषदेचा पुरस्कार, संगीत नाटक अकादमी पुरस्कार, चतुरंग प्रतिष्ठानचा जीवनगौरव पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते.

## श्री. इंद्रकुमार गुजराल

सन १९९० च्या दशकाअखेर आघाडी सरकारचे नेतृत्व केलेले भारताचे माजी पंतप्रधान श्री. इंद्रकुमार गुजराल यांचे दि. ३० नोव्हेंबर, २०१२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९२ वर्षांचे होते.

## डॉ. शरदचंद्र गोखले

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे समाजशास्त्रज्ञ आणि ज्येष्ठ पत्रकार डॉ. शरदचंद्र गोखले यांचे दि. १५ जानेवारी, २०१३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८७ वर्षांचे होते. यांनी राज्य शासनाच्या समाजकल्याण विभागात संचालक म्हणून प्रदीर्घ सेवा केली होती. त्यानंतर

कम्युनिटी एड अँड स्पॉन्सरशिप प्रोग्राम, इंटरनॅशनल लेप्रसी युनियन आणि आंतरराष्ट्रीय दीर्घायू केंद्र, भारत या तीन संस्थाची स्थापना केली होती. त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते.

## श्रीमती ज्योत्स्ना देवधर

मराठीसह हिंदीमध्येही विपुल लेखन करणाऱ्या आकाशवाणीच्या ज्येष्ठ निर्मात्या श्रीमती ज्योत्स्ना देवधर यांचे दि. १७ जानेवारी, २०१३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८६ वर्षांच्या होत्या. सन १९६० च्या सुमारास आकाशवाणीवर निर्मात्या म्हणून त्यांनी काम केले होते. त्यानंतर सलग २४ वर्षे त्यांनी विविध जबाबदाऱ्या हाताळल्या होत्या. त्यांना अनेक पुरस्कारानी सन्मानित करण्यात आले होते.

## श्री. म. वि. तथा मामासाहेब कौंडिण्य

ज्येष्ठ शिक्षकतज्ज्ञ, जीवनगौरव पुरस्कार विजेते आणि संगमनेर महाविद्यालयाचे शिल्पकार श्री. म. वि. तथा मामासाहेब कौंडिण्य यांचे वृद्धपकाळाने दि. २८ जानेवारी, २०१३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८० वर्षांचे होते. श्री. कौंडिण्य सलग ३३ वर्ष संगमनेर महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी होते.

## अँड. एम. पी. वशी

ज्येष्ठ विधीतज्ज्ञ अँड. एम. पी. वशी यांचे हृदयविकाराने दि. ११ फेब्रुवारी, २०१३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षांचे होते. अँड एम. पी. वशी हे गेल्या ५६ वर्षापासून मुंबई हायकोर्टात वकिली करीत होते. बॉम्बे अँडव्होकेट असोसिएशन, बॉम्बे सिटी सिव्हील अँड सेशन्स कोर्ट असोसिएशन व नॉर्थ बॉम्बे अँडव्होकेट्स असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले होते. राज्यातल्या विधी महाविद्यालयांना शासकीय अनुदान मिळण्यासाठी त्यांनी मुंबई हायकोर्टात व सुप्रीम कोर्टात जनहित याचिका दाखल केली होती. अँड. एम. पी. वशी यांनी सन १९८७ साली मुंबई विद्यापीठाच्या अधिसभा सदस्य म्हणून काम केले होते.

## श्री. दत्ताजी नलावडे

नगरसेवक ते मुंबईचे महापौर व विधानसभेचे अध्यक्ष अशा राजकारणातील आपल्या यशस्वी कारकिर्दीमध्ये जनसामान्यांशी असलेली नाळ सतत जोडणारे ज्येष्ठ नेते श्री. दत्ताजी नलावडे यांचे दि. १५ फेब्रुवारी, २०१३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७७ वर्षांचे होते.

## श्री. मुकुंदराव किर्लोस्कर

ज्येष्ठ पत्रकार व किर्लोस्कर मासिकाचे माजी संपादक श्री. मुकुंदराव किर्लोस्कर यांचे दि. २८ फेब्रुवारी, २०१३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९१ वर्षांचे होते.

यानंतर अधिसभेतर्फे वरील मान्यवरांच्या दु:खद निधनाबद्दल एक मिनिट उभे राहून मौन पाळून श्रध्दांजली वाहण्यात आली.

अधिसभेच्या अधिकृत कार्यक्रमपत्रिकेवर विचार करण्यापूर्वी खालील पुरस्कार प्राप्त व्यक्तींचे, संस्थाचे अभिनंदन करण्यात आले.

➢ महाराष्ट्र राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्यावतीने मुंबई विद्यापीठातील संस्कृत विभागाच्या विभागप्रमुख डॉ. उमा वैद्य व रूईया महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास पेडणेकर यांना ना. पालकमंत्री जयंत पाटील यांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

➢ हिंदुजा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी. ए. शिवारे यांची इंडियन कॉमर्स असोसिएशन या संघटनेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

➢ भारत सरकारच्या युवा व क्रीडा मंत्रालयातर्फे दिला जाणारा २०११-१२ चा 'इंदिरा गांधी एनएसएस राष्ट्रीय पुरस्कार' मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. अतुल साळुंखे यांना आणि विवा महाविद्यालयाचा विद्यार्थी भूपेंद्र मिश्रा याला 'उत्कृष्ट स्वयंसेवक' पुरस्कार बहाल करण्यात आला. हा पुरस्कार नवी दिल्ली येथे भारताचे राष्ट्रपती मा. प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

➢ संगीत नाटक अकादमी २०१२ चा उत्कृष्ट दिग्दर्शनाच्या पुरस्कारासाठी श्री. वामन केंद्रे यांची निवड करण्यात आली.

➢ संगीत नाटक अकादमी २०१२ चा उत्कृष्ट लावणी पुरस्कारासाठी श्रीमती सुलोचना चव्हाण यांची निवड करण्यात आली. त्या मुंबई विद्यापीठाच्या लोककला विभागाच्या मानद व्याख्यात्या आहेत.

➢ संगीत नाटक अकादमीतर्फे २०१२ चा बिस्मील्ला खाँ युवा पुरस्कार कृष्णा मुसळे यांना प्रदान करण्यात आला.

➢ मुंबई विद्यापीठातील संस्कृत विभागाच्या विभागप्रमुख डॉ. उमा वैद्य यांची कालिदास संस्कृत साधना पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

➢ मुंबई विद्यापीठातील गरवारे व्यवसाय शिक्षण व विकास संस्थेचे संचालक डॉ. रामभाऊ बडोदे यांची सन २०१२ च्या देवांग मेहता बिझनेस स्कूल अँवार्डसाठी निवड करण्यात आली.

➢ उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्यावतीने मुंबई विद्यापीठातील इंग्रजी विभागाच्या विभागप्रमुख डॉ. कुमी एस. विवैना यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

➢ महाराष्ट्र राज्याच्या हिंदी साहित्य अकादमीतर्फे दिला जाणारा २०११ चा आचार्य महावीर प्रसाद द्विवैदी हिंदी भाषा पुरस्कार डॉ. करूणाशंकर उपाध्याय यांना प्रदान करण्यात आला.

➢ मुंबई विद्यापीठाच्या अल्केश दिनेश मोदी वित्तीय व व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्थेला देवांग मेहता अँवार्ड, ऐबीपी न्यूज इंटरफेस अँवार्ड व ऐबीपी न्यूज सिलँबस इन फायनान्स अँवार्ड प्रदान करण्यात आला.

➢ मुंबई विद्यापीठाच्या जमनालाल बजाज व्यवस्थापन संस्थेला बेस्ट बिझनेस स्कूल हा देवांग मेहता अँवार्ड प्रदान करण्यात आला.

➢ मुंबई विद्यापीठातील वित्त व लेखा अधिकारी म्हणून श्री. अ. आ. फळणीकर यांची नियुक्ती करण्यात आली.

➢ मुंबई विद्यापीठाच्या संस्कृत विभागाच्या विभागप्रमुख डॉ. उमा वैद्य यांची नागपूर जिल्हयातील रामटेक येथील कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या कुलगुरूपदी निवड झाली.

➢ राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) वर्षभरातील सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठीचा मानाचा 'पंतप्रधान बँनर' सलग सहाव्या वर्षी महाराष्ट्र संचलनालयाने सर्वागीण विजेतेपदाची हॅट्रिक साधून मिळविला. महाराष्ट्र पथकाच्यावतीने मुंबईच्या अग्रवाल महाविद्यालयांची कु. प्रतिभा तिवारी व कल्याणच्या बिर्ला महाविद्यालयांचा श्री. अनिकेत जळगावकर या विद्यार्थ्यांना पंतप्रधानाच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

➢ सुरतच्या वीर नर्मदा विद्यापीठामध्ये पार पडलेल्या २८ व्या पश्चिम विभागीय युवा महोत्सवात मुंबई विद्यापीठाने २५ पैकी १८ स्पर्धामध्ये निर्विवाद वर्चस्व राखत विजेतेपद पटकावले, या महोत्सवात भारताच्या पश्चिम विभागातील २९ विद्यापीठानी सहभाग घेतलेलो होता.

➢ भारतीय विद्यापीठ असोसिएशनच्यावतीने कोलकता येथील कल्याण विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय युवा सांस्कृतिक महोत्सवात मुंबई विद्यापीठातील कलावंतानी विविध स्पर्धामध्ये सलग तिस-यांदा देशभरात पहिले येण्याचा मान पटकावला. तसेच महोत्सवाच्या इतिहासात पहिल्यांदाच सर्वाधिक १०९ गुण मिळवून या विद्यार्थ्यांनी नवा विक्रम प्रस्थापित करीत मुंबई विद्यापीठाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवलेला आहे.

यानंतर अध्यक्षांनी कार्यक्रम पत्रिकेवरील बाब क्रमांक १ अधिसभेपुढे मंजुरीसाठी मांडली.

**बाब क्र. १ : दिनांक ०५ ऑक्टोबर, २०१२, रोजी झालेल्या अधिसभेच्या *सर्वसाधारण* सभेचे इतिवृत्त संमत करणे.**

कार्यक्रम पत्रिकेवरील हा विषय सभेपुढे आला असता त्यावर सभेत सविस्तर चर्चा झाली. सभेपुढे इतिवृत्त म्हणून जे देण्यात आले आहे. त्यात अनेक त्रुटी व चुका आहेत, इतिवृत्तात काही अधिसभा सदस्यांची नावे चुकीची लिहिलेली आहेत अधिसभेत झालेल्या चर्चेची वास्तविक स्थिती इतिवृत्तात नाही, स्थगन प्रस्तावांचा व ते मांडणा-या तसेच त्यावर चर्चा करणा-या सदस्यांची नावे त्यामध्ये नाहीत, मा. कुलगुरूंनी दिलेल्या आश्वासनांचा तसेच निर्णयांचा उल्लेख त्यामध्ये नाही, इतिवृत्त बारा पानांचे आहे, त्यापैकी नऊ पाने अभिनंदन प्रस्ताव, शोक प्रस्ताव, सभेत उपस्थित सदस्यांची नावे यावर आहेत व सभेत झालेल्या चर्चेवर फक्त तीनच पाने आहेत. आदी आक्षेप सन्माननीय डॉ. (श्रीमती) माधवी निकम, श्री. प्रदीप सावंत, श्री. गणेश चव्हाण, डॉ.(श्रीमती) मधू परांजपे, डॉ. बिंदूप्रकाश मिश्रा, डॉ. अभय बांबोले, डॉ. वसंत शेकडे, श्री. दिलीप करंडे, डॉ. जालिंदर अडसुळे, श्रीमती निलिमा भुर्के, डॉ. (श्रीमती) अनुराधा मझुमदार, डॉ. (श्रीमती) सुनिता खारीवाल, श्री. संजय वैराळ, डॉ. (श्रीमती) संगीता गोडबोले, प्राचार्य विठ्ठल रोकडे, व डॉ. (श्रीमती) मोहसिना मुकादम यांनी निषेध नोंदवत इतिवृत्त संमत करण्यास नकार दर्शविला व व्यवस्थित इतिवृत्त देण्याची मागणी केली.

सभेपुढे सादर करण्यात आलेल्या इतिवृत्तात काही सूचना असतील तर सन्माननीय सदस्यांनी त्या सुचवाव्या व अध्यक्षांनी मान्य केलेल्या सूचनांचा अंतर्भाव करून इतिवृत्त संमत करावे, जेणेकरून सभागृहाचा वेळ वाचेल व अधिसभेचे कामकाज पुढे सरकेल अशी भावना सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश पागे, प्रा. अंबादास मोहिते, श्री. वसंतरावजी ओस्वाल डॉ. बाळकृष्ण भोसले, डॉ. विजय पवार, प्राचार्य कृष्णा पाटील, प्रा.(श्रीमती) रूपा शहा, श्री. भिकु इदाते, प्राचार्य नारायण राजाध्यक्ष आणि प्राचार्या (श्रीमती) कमला बालसुब्रमण्यम, प्राचार्य मुरलीधर चांदेकर यांनी व्यक्त केली. काही सदस्यांना इतिवृत्ताची प्रत मिळाली नाही असे डॉ. (श्रीमती) संगिता गोडबोले, श्री. दिलीप करंडे, श्री. महादेव जगताप या सदस्यांनी सांगितले असता कुलसचिव यांनी संगणकीय चकती व इतिवृत्त दिनांक ८ फेब्रुवारी, २०१३ रोजी पोस्टाने पाठविल्याचे सांगितले व चुकून कोणाला पोस्टाद्वारे मिळाले नसेल किंवा वेळेत मिळाले नसेल तर दिलगिरी व्यक्त करून सर्वांना तात्काळ इतिवृत्त देण्याची व्यवस्था केली.

इतिवृत्त व प्रोसिडिंग मधील फरक सांगून मा. कुलगुरू म्हणाले की, इतिवृत्तामध्ये कार्यक्रमपत्रिकेवर काय निर्णय झाले ते दिलेले असतात. इतिवृत्त संक्षिप्त असले तरी प्रोसिडिंगमध्ये सविस्तर माहिती दिली आहे. प्रशासनाच्या मते इतिवृत्ताच्या परिभाषेतील इतिवृत्त आपल्याला दिले आहे. पण आपण कार्यक्रमपत्रिके व्यतिरिक्त मांडलेले मुद्दे या इतिवृत्तात आलेले नाहीत, तर आपण तशा सूचना कराव्यात, त्याचा विचार करून अंतर्भाव करू व नंतर इतिवृत्त मंजूर करण्यात येईल. प्राचार्य नारायण राजाध्यक्ष यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे इतिवृत्ताबाबत सूचना कराव्यात. प्रशासन त्याचा इतिवृत्तात सामावेश करेल व सुधारित इतिवृत्त पुन्हा सभागृहापुढे मांडले जाईल. प्र-कुलगुरू, प्राचार्य डॉ. राजपाल हांडे व कुलसचिवांनीसुध्दा इतिवृत्ताबाबत सन्माननीय सदस्यांच्या शंकाचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला.

सुधारित इतिवृत्त सभेपुढे सादर केल्यावर सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

कार्यक्रम पत्रिकेवरील बाब क्र. २ प्रश्नोत्तराच्या तासाची घोषणा कुलसचिवांनी करताच सन्माननीय सदस्य श्री. दिलीप करंडे म्हणाले की, विद्यार्थी हा केंद्रबिंदू आहे, त्यांचे प्रश्न सोडविणे हे विद्यापीठाचे तसेच कुलगुरूंचे कर्तव्य आहे. विद्यापीठाच्या प्राध्यापकांनी प्रलंबित न्यायी मागण्यांसाठी पुकारलेल्या संपामुळे परीक्षेसंदर्भात विद्यार्थी तसेच पालक वर्गात गोंधळ व तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. संपामुळे काही केंद्रांवर विज्ञान शाखेच्या प्रॅक्टिकल परीक्षा झाल्या नाहीत व काही पुढे ढकलण्यात आल्यात. विद्यापीठाने परीक्षा वेळेत घ्याव्यात, जेणेकरून विद्यार्थ्यांना वेळेत नोकरीसाठी तसेच पुढील शिक्षणासाठी प्रयत्न करता येतील. परीक्षा वेळेत घेण्यासाठी राज्यपालांनी निर्गमित केलेल्या आदेशाचे पालन

करावे, आदेशानुसार परीक्षा घेण्यात सहकार्य न करणा-यांविरूद्ध कार्यवाही करण्यात यावी, 'ऑनलाईन फार्मस्' भरण्यासंदर्भात झालेल्या चुका, काही परीक्षा पुढे का ढकलण्यात आल्या याबाबत विद्यापीठाने खुलासा करावा. आदी मुद्द्यांवर चर्चेदरम्यान श्री. दिलीप करंडे, श्री. गणेश चव्हाण, श्री. अक्षय पुजारे, श्री. प्रदीप सावंत, श्री. संजय वैराळ व श्रीमती निलिमा भुर्के या सन्माननीय सदस्यांनी गांर्भियाने प्रश्न उपस्थित केले व परीक्षा वेळेवर झाल्याच पाहिजेत अशी आग्रही मागणी केली.

प्राध्यापकांच्या न्याय्य मागण्यांसाठी शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करूनही मागण्या मान्य होत नसल्यामुळे, इच्छा नसतानाही प्राध्यापकांना संप पुकारावा लागला. प्राध्यापकच फक्त चुकीचे वागत आहेत, असे वातावरण तयार केले जात आहे. प्राध्यापक मुलांना शिकवितात, त्यांना घडवितात. त्यांच्या भविष्याची प्राध्यापकांना सुध्दा काळजी असते ही बाब लक्षात घ्यावी. प्राध्यापकांच्या न्याय्य मागण्यांच्या पुर्ततेकरीता विद्यापीठानेसुध्दा परीक्षा पुढे घेऊन सहकार्य करावे अशी विनंती संघटनेतर्फे वेळोवेळी करण्यात आली होती. परंतु विद्यापीठाने सहकार्य केले नाही. विज्ञान शाखेच्या प्रॅक्टिकल परीक्षा १०% ते २०% केंद्रावर झालेली असताना पेपरमध्ये ५०% परीक्षा झाल्याच्या खोटया बातम्या देण्यात आल्या. ज्या ज्या परीक्षा केंद्रावर परीक्षा घेण्यात आल्या त्या अपु-या व कमी अनुभवी शिक्षक वर्गाकडून घेण्यात आल्या. खांडवाला कॉलेजच्या प्राचार्या (श्रीमती) ॲन्सी जोस यांनी पोलीस बळाच्या जोरावर परीक्षा घेतल्या ही बाब निषेधार्थ आहे. तसेच वझे महाविद्यालयातील २०० विद्यार्थ्यांनी सभा घेऊन प्राध्यापकांना पाठिंबा दर्शविला. आदी मुद्दे पोटतिडकीने डॉ.(श्रीमती) मधू परांजपे, डॉ. (श्रीमती) माधवी निकम, डॉ. (श्रीमती) अनुपमा सावंत आणि डॉ. वसंत शेकडे यांनी चर्चेदरम्यान मांडले व शासनाकडून मागण्या मान्य करून घेण्यासाठी आम्हाला सर्वांच्या सहकार्याची गरज आहे. अशी भावना व्यक्त करून कुलगुरूंनी प्राध्यापकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत असे आव्हान केले.

बहिष्काराचा मार्ग चुकीचा आहे. परीक्षेवरील बहिष्कारामुळे सरकारचे काही जात नाही, विद्यार्थ्यांचेच नुकसान होईल, विद्यार्थी महत्वाचा असल्यामुळे परीक्षा घ्यायलाच पाहिजेत कुलगुरूंनी शासनाकडे पाठपुरावा करून योग्य मार्ग वेळेत काढावा अशी भूमिका सन्माननीय सदस्य डॉ. विजय पवार यांनी मांडली.

प्राचार्या (श्रीमती) ॲन्सी जोस यांनी त्यांच्यावरील आरोपाबाबत स्पष्टीकरण देताना महाविद्यालय व्यवस्थापनाच्या निर्णयानुसार व सर्व शिक्षकांना विश्वासात घेऊन परीक्षा आयोजनाचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले, तसेच स्वत:च्या महाविद्यालयात परीक्षा होऊ देणे व इतर महाविद्यालयात परीक्षेत अडथळे आणणे अशी दुहेरी भूमिका घेणा-या शिक्षकांबद्दल आश्चर्य व्यक्त केले.

दिनांक २८ मार्च, २०१३ पासून सुरू होणा-या टी.वाय.बी.कॉम च्या परीक्षांचे ओळखपत्रे विद्यार्थ्यांना देण्यात आलेली आहेत. परीक्षेचे सर्व पेपर तयार असून त्यांची छपाई झालेली आहे. परीक्षा केंद्रही जाहीर करण्यात आलेली आहेत. परीक्षेच्यादृष्टीने सर्व तयारी झालेली आहे. असा खुलासा (डॉ.) मधू नायर यांनी केला.

विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, तसेच प्राध्यापकांच्या मागण्याही रास्त आहेत. विद्यापीठाच्या कुलगुरूंनी काय करावे याबाबत राज्यपालांनी आदेश निर्गमित केले आहेत. त्यामुळे संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने परीक्षा होणे गरजेचे आहे. कारण विद्यार्थी पुढील शिक्षणासाठी बाहेरगावी जातात. विद्यापीठ चालते ते विद्यार्थ्यांच्या भरवशावर परंतु लोकशाही प्रक्रियेतले सगळे मार्ग अवलंबिल्यानंतर 'देखील शासन मागण्या मान्य करत नसेल तर नाईलाजास्तव असा मार्ग अवलंबावा लागतो. प्राध्यपकांची इच्छा नसतानाही बहिष्कार करावा लागतो. सभागृहाच्या ज्या काही भावना आहेत त्या भावना शासन दरबारी मांडले जाणे गरजेचे आहे. एकटया कुलगुरूंवर खापर फोडणे योग्य नाही. आपण सर्वांनी सहकार्य करायला पाहिजे, अशी भूमिका श्री. संजय शेटे, प्रा. अंबादास मोहिते, प्राचार्य मुरलीधर चांदेकर, श्री प्रकाश पागे, श्री सलीम पटेल, प्राचार्या (श्रीमती) कमला बालसुब्रमण्यम व डॉ. मधू नायर या सन्माननीय सदस्यांनी मांडली.

प्राध्यपकांच्या संपाचे गांभीर्य लक्षात घेऊन मा. कुलगुरू स्वत: राज्यपाल, मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री यांचेकडे चर्चेकरीता गेले होते अशी माहिती प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांनी दिली.

शासन दरबारी आपल्याला न्याय मिळत नसेल तर राज्यपाल हे अधिसभेचे अध्यक्ष आहेत. त्यामुळे त्यांच्याकडे या सभागृहाच्या भावना पोहचल्या पाहिजेत व त्याकरिता सभागृहातील सन्माननीय सदस्यांचे एक शिष्टमंडळ तयार करावे. शिष्ट मंडळाच्या मार्फत या सभागृहाच्या भावना राज्यपालांकडे पोहोचवण्याचा ठराव प्रा. अंबादास मोहिते यांनी मांडला व त्यास श्री. संजय शेटे यांनी अनुमोदन दिले.

चर्चेला उत्तर देताना मा. कुलगुरू म्हणाले की, कुलगुरू म्हणून काही जबाबदा-या कायदयाच्या अंतर्गत असतात, त्या कायद्याच्या अंतर्गत असणा-या आणि त्या त्या क्षणाला, त्या त्या वेळी जे प्रसंग असतात त्या प्रसंगाच्या आधारे या विद्यापीठ कायदयाच्या अनुषगांने आणि विद्यापीठ कायद्यामध्ये ज्या तरतुदी नसतील पण त्या क्षणाला त्या अभिप्रेत असतील तर त्या जबाबदा-या कुलगुरु या पदाला व त्यांच्या सर्व सहका-यांना त्या घ्याव्या लागतात. कदाचित या सगळया गोष्टी त्यांना आवडत असतील किंवा आवडत नसतील तरी ही त्या पदाच्या जबाबदारीमुळे त्यांना त्या त्या गोष्टी कराव्या लागतात हे आपण सर्वांनी मुद्दाम जाणून घ्यायला पाहिजे. मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुंनी शिक्षकांच्या मागण्यासाठी प्रयत्न केले नाहीत, असे याठिकाणी म्हणण्यात आले त्याबद्दल मी सभागृहाला मुद्दाम माहिती देऊ इच्छितो की, प्राध्यापकांच्या प्रश्नासंदर्भात प्राधान्याने ज्या ज्या स्तरावर प्रयत्न करायला पाहिजे त्या त्या स्तरावर कुलगुरूंनी स्वतःहून प्रयत्न केल्याचे तसेच मुंबई दूरदर्शनवरसुध्दा कुलगुरूंची भूमिका मांडण्यात आल्याची माहिती देऊन, कुलगुरूंनी शिक्षकांच्या मागण्यासाठी प्रयत्न केले नाहीत असे म्हणणे चुकीचे आहे, असे सभेच्या निदर्शनास आणून दिले. शिक्षकांच्या परीक्षेवरील बहिष्कारांमुळे होणा-या परिणामांबाबत मा. कुलपती सोबत झालेली चर्चा व त्यांना तोडगा काढण्याकरीता केलेली विनंती व त्यानंतर मा. कुलपतींनी मा. मुख्यमंत्री, मा. मानव संशोधन विकास मंत्री, राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांसोबत बोलल्याची माहिती सभागृहात दिली. तसेच मा. कुलपती कार्यालयास स्वतः लिहिलेले पत्र व इतर विद्यापीठांच्या कुलगुरूंना देखील मा. कुलपतींना पत्र पाठवावे याबाबत दूरध्वनीवरून कळविल्याचे सांगितले. मा. मुख्यमंत्र्यांना, शिक्षक संघटनांसोबत चर्चा करून योग्य तो तोडगा काढावा अशी विनंती पत्र व दूरध्वनीद्वारे केल्याची माहिती देऊन मा. कुलगुरु म्हणाले की, दिनांक २८ मार्च, २०१३ ची परीक्षा घ्यायची किंवा कसे याचा निर्णय दिनांक २३ मार्च, २०१३ रोजी होणा-या परीक्षा मंडळाच्या सभेत घेण्यात येईल. सभागृहाच्या भावना राज्यपालांकडे पोहोचविण्यासाठी प्रा. अंबादास मोहिते, प्रा. (श्रीमती) रूपा शहा, श्री. दिलीप करंडे, डॉ. (श्रीमती) मधू परांजपे, श्री. संजय शेटे व डॉ. उदय साळूंखे यांचा समावेश असलेले शिष्टमंडळ सर्वानुमते ठरविण्यात आले व मा. राज्यपालांसोबत शिष्टमंडळाच्या भेटीची वेळ कुलगुरूंनी निश्चित करण्याचे ठरले.

सभागृहाच्या संमतीने प्रश्नोत्तराच्या तासाअगोदर स्थगन प्रस्ताव घेण्याचे ठरले. वेळेची मर्यादा लक्षात घेता स्थगन प्रस्तावावर चर्चा करताना सन्माननीय सदस्यांनी अगदी थोडक्यात मुद्दे मांडावेत असे आव्हान मा. कुलगुरूंनी केले. डॉ. (श्रीमती) मधू परांजपे, श्री. दिलीप करंडे आणि श्री. संजय वैराळ या सन्माननीय सदस्यांना त्यांचे स्थगन प्रस्ताव क्रमाने मांडण्यास सांगितले.

डॉ. (श्रीमती) मधू परांजपे यांनी त्यांचा पुढील स्थगन प्रस्ताव सभागृहाच्या आधीच्या चर्चेत आश्वासन मिळाले असल्यामुळे मागे घेतला.

**"This House be adjourned to express concern at the attempts to disregard directives and orders of apex bodies such as UGC and MHRDM, simultaneously to express concern at violation of norms and statutes of the University by certain sections of administration."**

श्री. दिलीप करंडे यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव पुढीलप्रमाणे मांडला. सदर स्थगन प्रस्तावास प्राचार्य नारायण राजाध्यक्ष यांनी अनुमोदन दिले.

**"शिक्षण मंत्री माननीय राजेश टोपे यांच्या महाविद्यालयातील गैर कारभाराचे प्रकार समोर येऊन देखील विद्यापीठाचे कुलगुरू व उच्च प्रतिष्ठित अधिकारी व विद्यापीठ प्रशासन योग्य ती कारवाई करीत नाहीत. या विषयाचे गांर्भीय लक्षात घेऊन ही सभा संपूर्ण दिवस तहकूब करावी." (कामकाजाची वेळ)**

शिक्षण मंत्री श्री. राजेश टोपे यांच्या महाविद्यालयात गैरकारभाराचे प्रकार समोर येऊन देखील विद्यापीठ प्रशासन योग्य ती कार्यवाही का करत नाही असा प्रश्न श्री. दिलीप करंडे यांनी उपस्थित केला.

नियमित प्राचार्य नाहीत, शिक्षक नाहीत, विद्यार्थ्यांना सुविधा नाहीत, विद्यापीठाच्या नियमांचे पालन करत नाहीत अशा महाविद्यालयांवर कार्यवाही झालीच पाहिजे. महाविद्यालयावर पाठविण्यात येणा-या 'एलआयसी' समितीवर एक अधिसभा सदस्यही सहभागी करण्यात यावा. 'एलआयसी' समितीवर जाणा-या सदस्यांची बैठक बोलावून योग्य मार्गदर्शन करण्याची गरज आहे. सदर महाविद्यालयावर मे महिन्याच्या अखेर पर्यंत एलआयसी पाठविण्यात यावी आणि पुढच्या वर्षी त्यांना कंटीन्युएशन दयायचे की नाही याबाबत लवकरात लवकर ठरविले पाहिजे अशी सूचना प्राचार्य नारायण राजाध्यक्ष यांनी दिली.

श्री. दिलीप करंडे यांच्या स्थगन प्रस्तावाला उत्तर देताना मा. कुलगुरू म्हणाले की, कुलगुरू कोणत्याही महाविद्यालयाला परवानगी देऊ शकत नाही, कारवाई करू शकत नाही. दोन्ही गोष्टींसाठी प्रक्रिया आखून दिलेल्या आहेत. ज्याचा उल्लेख याठिकाणी झालेला आहे त्या महाविद्यालयाला परवानगी सन २००७ साली दिलेली आहे. महाविद्यालयाच्या संदर्भामध्ये विद्यापीठाला जेव्हा तक्रार प्राप्त झाली तेव्हा, त्या संदर्भामध्ये एक सत्यशोधक समिती स्थापन केली. सत्य शोधक समितीचा अहवाल आल्यानंतर मा. कुलगुरूंनी तो विद्वत परिषदेमध्ये चर्चेसाठी ठेवला. विद्वत परिषदेमध्ये चर्चा झाली. विद्वत परिषदेमध्ये निर्णय झाला,

त्या निर्णयाच्या अनुषंगाने त्या महाविद्यालयाला ज्या त्रुटी आहेत त्या त्रुटीच्या संदर्भामध्ये पत्र पाठविण्यात येत आहे.

मा. कुलगुरूंच्या विनंती नंतर श्री. दिलीप करंडे यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

श्री. संजय वैराळ यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव पुढीलप्रमाणे मांडला. सदर स्थगन प्रस्तावास प्राचार्य डॉ. अभय बाबोंले यांनी अनुमोदन दिले.

**"मुंबई विद्यापीठात मागासवर्गीय विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचा-यांवर होत असलेल्या अन्यायाला आपल्याकडून कोणताही न्याय मिळत नसल्यामुळे तसेच आपण अन्यायाच्या अत्याचारामध्ये होत असलेली वाढ लक्षात घेऊन सभागृह अर्धा तास तहकूब करावी."**

मागासवर्गीय विद्यार्थ्यांवर विद्यापीठात विविध स्तरावर अन्याय होत आहे. त्यांना प्रवेश प्रक्रियेत डावलले जात आहे. शासनाकडून तसेच विद्यापीठाकडून मिळणा-या विविध सुविधांपासून वंचित ठेवले जात आहे. त्याचप्रमाणे मागासवर्गीय शिक्षकेत्तर कर्मचा-यांना त्यांच्या न्याय्य मागण्या तक्रार निवारण समितीने मान्य केल्या तरी देखील, विद्यापीठ प्रशासन दखल घेत नाही. उदा. श्री. मोहन कांबळे व श्रीमती अस्मिता गायकवाड. रोस्टरबाबत मार्गदर्शन देण्यासाठी विद्यापीठ आणि मुक्ता या संघटनेने आयोजित केलेल्या कार्यशाळेत मार्गदर्शनासाठी आलेल्या आयएएस अधिका-यांनी जात पडताळणी सक्तीची आहे. जातपडताळणीसाठी तीन महिन्याची नोटीस देण्यात यावी व त्या अनुषंगाने कार्यवाही करावी. अशा प्रकारचे वक्तव्य केल्यामुळे २५ ते ३० वर्ष येथे काम केलेल्या शिक्षकांना काढून टाकल्याचे बोलले जात आहे. तसेच स्थायी समितीची बैठक विद्यापीठाने मागील दोन वर्ष घेतलेली नाही, बैठक लवकरात लवकर घेण्यात यावी. स्थायी समितीचा कार्यकाल केव्हा समाप्त होत आहे तसेच समितीच्या सभासदांची नावे सभागृहाला सांगावी. जात पडताळणीसाठी लागणारा वेळ लक्षात घेता तीन महिन्यांची दिलेली मुदत शिथिल करण्याचे परिपत्रक विद्यापीठाने लवकरात लवकर निर्गमीत करावे. भाऊसाहेब नेने महाविद्यालय, येथील भूगोल विषयाच्या मागासवर्गीय प्राध्यापकावर विद्यापीठाची भूगोल विषय बंद करण्याची परवानगी नसतानाही सेवा समाप्तीचे पत्र देवून जाणीवपूर्वक अन्याय करण्यांत आला. तसेच पुढील शिक्षणासाठी गरीब गरजू मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विद्यापीठाने पुरेसे वसतीगृह उपलब्ध करून देण्यात यावे, नवीन वसतीगृह निर्माण करण्यात यावी. स्पर्धात्मक परीक्षेसाठी सेंटरची निर्मिती करण्यात यावी. अशाप्रकारे या प्रस्तावावरील चर्चेत श्री. संजय वैराळ, डॉ. अभय बांबोले, डॉ. (श्रीमती) अनुपमा सांवत, प्राचार्य विठ्ठल रोकडे, डॉ. जालिंदर अडसुळे आणि डॉ. विवेक देशमुख या सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला.

सन्माननीय सदस्यांनी जे संवेदनशील मुद्दे मांडले त्यापैकी स्थायी समितीची बैठक २८ मार्च, २०१३ रोजी आयोजित करण्यात येत आहे. स्थायी समितीचा कार्यकाळ मार्च, २०१४ पर्यंतचा असून समितीचे सदस्य पुढील प्रमाणे आहेत मा. कुलगुरू चेअरमन आहे, सदस्य प्रा. गौतम गवळी, मानसशास्त्र विभाग, प्रा. अंबादास जाधव, भूगोल विभाग, प्रा. टी. आर. घोबले, इतिहास विभाग, प्राचार्य विठ्ठल. रोकडे, प्राचार्य टी. पु. टोपे, रात्र महाविद्यालय, प्राचार्य रामदास अत्रम, इस्लाम इसुफ महाविद्यालय, प्राचार्य श्रीमती प्रतिभा जाधव, एलफिस्टन महाविद्यालय, प्राचार्य कृष्णा पाटील, सिद्धार्थ, अर्थशास्त्र, वाणिज्य महाविद्यालय, प्राचार्य विष्णू. मगरे, किर्ती महाविद्यालय प्रा. मनीराम देकाटे, सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य विभाग, मुंबई विद्यापीठ, प्रा. रमेश कांबळे, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर चेअर कॉर्डीनेटर, मुंबई विद्यापीठ, डॉ. बाळासाहेब साळवे, अधिव्याख्याता, बी.एन.एन महाविद्यालय, प्रा. वर्षा साठे, अधिव्याख्याता, किर्ती महाविद्यालय, डॉ. (श्रीमती) एम्.एस. मोलवणे, सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग आणि डॉ. विजय पवार, सिद्धार्थ महाविद्यालय. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च ट्रेनिंग इन्स्टिटयुट, पुणे यांच्याकडून विद्यापीठाला स्पर्धा परीक्षेसाठी ट्रेनिंग इन्स्टिटयूट देण्यात आलेले असून त्यापैकी एक विद्यानगरी परिसरात व दुसरे रत्नागिरी परिसरात देण्यात येणार आहे. त्याचबरोबर दोन्ही सेंटरला ७८ लाख रूपये देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे १०० मुले व १०० मुलींसाठी वसतीगृह निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचारी श्री मोहन कांबळे व श्रीमती अस्मिता गायकवाड यांच्याबाबत माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तसेच नेने महाविद्यालयातील भूगोल विषयाची तुकडी बंद करून तेथील प्राध्यापकावर झालेल्या अन्यायाबाबत विद्वत परिषदेने घेतलेल्या निर्णयानुसार पुढील कार्यवाहीसाठी समिती पाठविण्यात येईल. जातपडताळणी संदर्भात महाविद्यालयांना परिपत्रक पाठविण्यात येईल. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या विभागातील प्रवेश प्रक्रियेसाठी असलेल्या 'मॉनिटरी' समितीला मागासवर्गीयांचे प्रवेश प्रक्रियेचे नियम काटेकोरपणे पालन करण्याचे आदेश देण्यात येतील. प्रवेश प्रक्रियेच्या 'मॉनिटरी' समितीमध्ये मागासवर्गीय प्रतिनिधी असेल. मागासवर्गीयांच्या आरक्षणाचे काटेकोरपणे पालन कसे करावे याबाबत कार्यशाळा आयोजित करण्यात येईल. त्याप्रमाणे १५ जून, २०१३ पूर्वी स्थायी समितीचे परिपत्रक सर्व महाविद्यालयाना पाठविण्यात येईल. या सर्व बाबींचा खुलासा प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांनी केला.

सदर आश्वासनानंतर श्री. संजय वैराळ यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

वेळेअभावी दिनांक २१ मार्च, २०१३ रोजीची सभा स्थगित करण्यात आली.

दिनांक २२ मार्च, २०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता स्थगित सभा सुरू झाली. अध्यक्षांनी सर्व सदस्यांचे हार्दिक स्वागत केले. कार्यक्रम पत्रिकेवरील बाब क्र. २ प्रश्नोत्तराचा तासास सुरूवात केली.

**बाब क्र. २ प्रश्नोत्तराचा तास :-**

प्रश्न क्र. १ च्या अनुषंगाने श्री. दिलीप करंडे यांनी कायमस्वरूपी कर्मचारी तेराशे आहेत आणि हंगामी कर्मचारी हे पंधराशे आहेत. विद्यापीठाला कर्मचा-यांची जर गरज आहे तर हंगामी कर्मचा-यांना कायमस्वरूपी का करण्यात येत नाही? तसेच सन २००८ मध्ये भरती प्रक्रियेमधून विद्यापीठाकडे २८ लाख १४ हजार रूपये जमा झाले त्याबाबत काय कार्यवाही केली? त्याचप्रमाणे हंगामी सुरक्षारक्षकांची नियुक्ती वेतनश्रेणी प्रमाणे का करण्यात येत नाही व त्यांना सेवेत कायम का करण्यात येत नाही असे उपप्रश्न उपस्थित केले.

विद्यापीठाच्या शिक्षकेत्तर मंजूर पदांपैकी ५४४ पदे रिक्त आहेत. तसेच परीक्षेच्या कामासाठी आणि इतर कामासाठी विद्यापीठात हंगामी कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले आहेत. सदर मंजूर पदांपैकी रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया चालू आहे. गट 'अ' १९ पदे, गट 'ब' ३५ पदे आणि गट 'क' १९४ पदे असे एकूण जवळ जवळ २४८ पदे भरण्याची प्रक्रिया सुरू असून एप्रिल, २०१३ पर्यंत भरती प्रक्रिया पूर्ण होईल. सन २००८ च्या भरती प्रक्रियेवर शासनाकडून स्थगिती आल्यामुळे किंवा बाकीच्या यंत्रणेकडून स्थगिती आल्यामुळे ते काम आपल्याला थांबवावे लागले, तरी सदर भरती प्रक्रिया पुन्हा सुरू करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शासन निर्णयानुसार सुरक्षारक्षक जसजसे सेवानिवृत्त होतील तसतशी त्यांची पदे हमालमध्ये विलिन करण्यात येतील आणि सुरक्षारक्षक हे 'आउट सोर्सिंग' करायचे, असे आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती कुलसचिवांनी सभेला दिली.

बृहन्मुंबई महानगरपालिकेत तसेच कालिदास संगीत विद्यापीठाची सुरक्षारक्षक पदाची जाहीरात आलेली आहे. बृहन्मुंबई व कालिदास संगीत विद्यापीठाला शासनाचे नियम लागू नाहीत का? असा उपप्रश्न प्राचार्य नारायण राज्याध्यक्ष यांनी उपस्थित केला असता कुलसचिवांनी सुरक्षारक्षकांबाबत शासनाच्या सूचना पाळाव्या लागतील व यांबाबत व्यवस्थापन परिषदेमध्ये बाब मांडून योग्य निर्णय घेण्यात येईल. असा खुलासा केला.

विद्यापीठात 'बायोमेट्रिक सिस्टिम' आहे का? ती केव्हा पासून लागू करण्यात आली आहे. विद्यापीठ कर्मचा-यांचे पगार 'बायोमेट्रिक्स नुसार' देण्यात येतात का? विद्यापीठातील हंगामी कर्मचा-यांची नियुक्ती करताना राखीव पदाचा विचार करता येतो का? हंगामी

कर्मचारी पंधरा- पंधरा वर्ष हंगामी म्हणून काम करीत आहे. त्यांना कायमस्वरूपी करण्यासाठी विद्यापीठ प्रयत्न करणार आहे का? चालू भरती प्रक्रियेत सन २००८ साली ज्यांनी अर्ज केला असेल परंतु त्यांनी वयाची मर्यादा ओलांडली असेल अशा व्यक्तीला समाविष्ट करण्यात येणार का? आदी उपप्रश्न सन्माननीय सदस्य श्री. महादेव जगताप, श्री. संजय वैराळ, श्री. राजन कोळंबेकर, श्री. प्रदीप सावंत, डॉ. (श्रीमती) माधवी निकम, डॉ. (श्रीमती) संगीता गोडबोले, श्री. गणेश चव्हाण आणि डॉ. वसंत शेकडे यांनी उपस्थित केले.

विद्यापीठात बायोमॅट्रिक सिस्टिम डिसेंबर २०१२ पासून लागू करण्यात आली आहे. कायमस्वरूपी कर्मचारी डिसेंबर पासून त्याच्यावर हजेरी देत आहे. बायोमॅट्रिकची जोडणी वित्त विभागाशी करण्याचे काम सुरू आहे व ते पूर्ण होताच कायमस्वरूपी कर्मचा-याचे मासिक वेतन त्याप्रमाणे काढण्यात येईल. त्याचप्रमाणे हंगामी स्वरूपाच्या पदावर ४५ दिवसा पेक्षा जास्त दिवस नियुक्ती करावी लागत असल्यास त्यासाठी देखील बिंदुनामावली लावली जाईल. रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरू असून सन २००८ साली ज्यांनी अर्ज केलेले आहेत त्यांना त्या त्या वर्गाप्रमाणे शिथिलता देण्यात येईल, असा खुलासा कुलसचिवांनी केला.

प्रश्न क्र. २ च्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य दिलीप करंडे यांनी पेपर तपासणीच्या कार्यात वेळ लागला, ज्या प्राध्यापकांनी पेपर तपासले नाहीत त्यांच्यावर विद्यापीठाने काय कार्यवाही केली ?

पेपर तपासण्यास सहकार्य न करण्या-या प्राध्यापकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. प्राध्यापकांकडून आलेले स्पष्टीकरण परीक्षा मंडळाच्या बैठकीत ठेवण्यात येईल व त्याप्रमाणे निर्णय घेण्यात येईल, असे प्र-कुलगुरूंनी उत्तर दिले.

प्रश्नोत्तरांचा तास समाप्त झाल्याचे मा. कुलगुरूंनी घोषित केले.

**बाब क्र. ३ : २०१३-२०१४ या वित्तीय वर्षासाठी विद्यापीठाचा अर्थसंकल्पीय अंदाज तसेच २०१२-२०१३ वर्षाकरिता सुधारित अर्थ संकल्पीय अंदाज.**

प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे, संचालक महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांनी व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीनुसार विद्यापीठाचा सन २०१३-१४ चा अर्थसंकल्पीय अंदाज सादर केला. त्यास प्राचार्य सिद्धेश्वर गडदे यांनी अनुमोदन दिले.

१) "महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम २८ (ई) ला अनुसरून व्यवस्थापन परिषदेने सादर केलेल्या वार्षिक वित्तीय विवरणाचा (ज्यात २०१३-२०१४ या वर्षाचा अर्थसंकल्पीय अंदाज तसेच २०१२-२०१३ सालासाठीचा सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज यांचा समावेश आहे.) विचार अधिसभेने करावा."

२) "वार्षिक वित्तीय विवरणामध्ये तपशीलवार दिलेले २०१३-२०१४ सालासाठीचे अर्थसंकल्पीय अंदाज तसेच २०१२-२०१३ सालासाठीचे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज विचारात घेऊन स्वीकृत आणि संमत करावे."

प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे, संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांनी विद्यापीठाचा २०१३-१४ वर्षाच्या अर्थसंकल्पावर प्रामुख्याने १) वाढ आणि विकास २) बांधकाम आणि विकास ३) आर्थिक स्थिती ४) आर्थिक वर्ष २०१२-१३ साठी मिळालेली देणगी ५) २०१३-१४ अर्थसंकल्पीय अंदाज - आवर्ती खात्याची स्थिती, अनावर्ती खात्याची स्थिती ६) निधीमध्ये अंशदान, या मुद्द्यांवर भाषण केले.

डॉ. राजन तुंगारे यांनी सादर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकाची प्रशंसा केली तसेच त्यामधील ठळक वैशिष्ट्ये व उणिवा विशद केल्या. प्राचार्य कृष्णा पाटील यांनी विद्यार्थी वसतीगृह व विद्यापीठ सुशोभिकरणासाठी अल्प तरतूद करण्यात आल्याची बाब मांडली तर डॉ. संजय कुमार यांनी 'व्हर्टिकल ग्रोथ' विषयी मत मांडले. डॉ. (श्रीमती) शेफाली पंड्या यांनी मुलींकरिता आत्मरक्षणासंदर्भात योजना सुरू केल्याबद्दल विद्यापीठाचे अभिनंदन केले व विद्यापीठस्तरावर संशोधन कार्याला चालना देण्याकरिता सूचना दिल्या.

कुलगुरूंनी वसतीगृहाच्या कामकाजासाठी करण्यात आलेल्या तरतुदीमध्ये पूर्तता होणार नाही असे सभागृहाला सांगून वसतीगृहाच्या बांधकामाच्या विविध प्रक्रिया असतात. त्याचा आराखडा तयार करणे, महानगरपालिकेकडून तो मंजूर करून घेणे, फक्त या सदरच्या कामासाठी कमी रक्कमेची तरतूद केलेली आहे. या संदर्भात आपल्याला विविध संस्थेकडून अनुदान प्राप्त करून घेण्यासाठी प्रयत्न करायचे आहेत असा खुलासा केला.

बजेटवर चर्चा करताना सन्माननीय सदस्य श्री. दिलीप करंडे यांनी बजेटमध्ये ब-याच 'हेड' खालील तरतूदीचा वापर केला जात नसतानाही या वर्षी देखील पुन्हा तरतूद का करण्यात आली आहे? दूरशिक्षण विभागाच्या विद्यार्थ्यांच्या सुविधांसाठी १०,००,०००/- लाख रूपयाची तरतूद करून विद्यार्थ्यांसाठी कॉमन रूम, जिम्नेशियम, स्पोर्ट क्लब उपलब्ध करून दयावे, सीसीएफ संचालक श्री. मुजुमदार, परीक्षा नियंत्रक श्री. विलास शिंदे आणि आयडॉलमधील कर्मचारी श्री. लोखंडे यांच्या निलंबना नंतर नियुक्त केलेल्या चौकशी समितीचा रिपोर्ट तसेच परीक्षा रिफॉर्म समितीचा रिपोर्ट प्राधिकरणांपुढे का सादर केले जात नाही. पश्चिम विभागीय केंद्र, विद्यानगरी (WRIC) मधील प्राध्यापक नरसाळे यांच्याबाबतचा

तसेच वसंतदादा पाटिल अभियांत्रिकी महाविद्यालयाचे बांधलेले अनाधिकृत मजले, याबाबतचा अहवाल प्राधिकरणापुढे का सादर केला जात नाही, आदी मुद्दे उपस्थित केले.

आयडॉलच्या विद्यार्थ्यांना सुविधा पुरविण्यासंबंधी बजेटमध्ये १०,००,०००/- रूपयाची तरतूद केलेली असल्याचा खुलासा प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांनी केला.

यानंतर मा. कुलगुरूंनी सन्माननीय सदस्य श्री. महादेव जगताप यांना दुरूस्ती सूचना संक्षिप्त स्वरूपात सादरीकरण करण्याची विंनती केली.

श्री. महादेव जगताप यांनी आपली दुरूस्ती सूचना मांडताना मराठीसाठी केलेला दोन लाखाच्या तरतुदीचा तसेच, कुलगुरूंकडून प्रोत्साहन/गुणगौरव पुरस्कारासाठी सव्वा लाखाच्या केलेल्या तरतुदीचा वापर न करणे, नेट/सेट संदर्भात विद्यार्थ्यांना लेक्चरची सुविधा पुरविण्यासाठी फक्त दहा हजार रूपयांची केलेली तरतूद कमी असून त्यात वाढ करण्यात यावी. ठाणे उपकेंद्राची संथ गतीने सुरू असलेली प्रगती, ठाणे उपकेंद्राच्या कंपाऊडच्या भिंतीचे काम, कॉम्पुटर सायन्स आणि आयटी या विभागातील विद्यार्थ्यांच्या समस्या तसेच सदर विभागातील प्राध्यापकांच्या रिक्त जागा अॅकेडमिक फॉर करिअर अॅडमिनिस्ट्रेशनच्या संचालकाला अठरा हजार रूपये पगार देण्याची तरतूद दाखविण्यात आल्यामुळे अॅकेडमिक फॉर करिअर अॅडमिनिस्ट्रेशनचा दर्जा टिकविण्याचा प्रश्न, आदी मुद्दे सभेपुढे मांडले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालयाची सुविधा दोन शिपमध्ये चालवण्यात यावी. EYES सारखा महत्वाचा कार्यक्रम व्हिडिओ कॉन्फरन्सने महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविला जावा अशा सूचनाही केल्या.

कम्युनिटी महाविद्यालयाची घोषणा केली मात्र त्याचे कोर्स डिझाइन झालेले नाही. सदर कोर्सला एकाही विद्यार्थ्याने अद्याप प्रवेश घेतलेला नाही. विद्यापीठात होणा-या कार्यक्रमांच्या बैठकांच्या निमंत्रणपत्रिका वेळेत मिळत नाहीत, मराठी भाषा दिन हा २७ फेब्रुवारीला घेण्यात यावा. तसेच मराठी भाषा दिन सर्व महाविद्यालयांमध्ये देखील साजरा झाला पाहिजे, मुंबई विद्यापीठाची 'वेबसाईट' मराठीत व्हावी आदी मुद्दे आणि त्या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सन्माननीय सदस्य श्री. दिलीप करंडे, श्री प्रदिप सावंत, श्री राजन कोळंबेकर, श्रीमती निलीमा भुर्के, श्री अभय बांबोले, डॉ. वसंत शेकडे यांनी सहभाग घेतला.

कम्युनिटी महाविद्यालयाचा कोर्स डिझाइन झालेला आहे. त्याचप्रमाणे प्रवेशाची प्रक्रिया एप्रिलपासून सुरू होणार आहे. मुंबई विद्यापीठाची वेबसाईट मराठी करण्याची प्रक्रिया सुरू असून लवकरच पूर्ण करण्यात येईल. तसेच व्हिडिओ कॉन्फरन्सकरिता तीनशे महाविद्यालये रजिस्टर झाली असल्याची माहिती प्राचार्य (डॉ) राजपाल हांडे यांनी दिली.

सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या सूचना लक्षात घेता मराठी भाषेचा विकास व्हावा, उचित सन्मान व्हावा याकरिता सर्व महाविद्यालयांना 'मराठी भाषा दिन' साजरा करण्याबाबत कळविण्यात येईल व 'मराठी भाषा दिन' सर्वांच्या सहकार्याने थाटामाटात व चांगल्या पध्दतीने साजरा करण्याकरिता प्रयत्न केले जातील, असे आश्वासन कुलसचिवांनी दिले. ठाणे उपकेंद्र बांधकामाचा 'प्लॅन' मंजूर झाल्याचे व कपाउंडच्या भिंतीचे काम अतिक्रमणामुळे थांबल्याची माहिती कुलसचिवांनी सभेला दिली.

श्री. महादेव जगताप यांनी मा. कुलगुरूंच्या विनंती नंतर त्यांच्या दुरूस्ती सूचना मागे घेतल्या.

यानंतर मा. कुलगुरूंनी सन्माननीय सदस्य डॉ. दिपक बिडवई यांना दुरूस्ती सूचना संक्षिप्त स्वरूपात सादरीकरण करण्याची विंनती केली.

डॉ. दिपक बिडवई यांनी आपली दुरूस्ती सूचना मागे घेत असल्याचे नमूद करून काही महत्त्वाच्या मुददयावरती बोलण्याची इच्छा व्यक्त करत, प्राध्यपकांचे प्रश्न सोडविण्यासाठी मा. कुलगुरूंनी प्रयत्न करावेत तसेच विनाअनुदानित महाविद्यालयाच्या जाहिराती महाविद्यालयांना महाराष्ट्र टाइम्स व इंडियन एक्सप्रेस मध्ये देणे परवडत नाही. महाविद्यालयांच्या जाहिराती परवानगीसाठी विद्यापीठात येतात तेव्हा त्या एकत्र करून दैनिक महाराष्ट्र टाइम्स वर्तमानपत्रात दयाव्यात. प्राचार्यांच्या रिक्त जागा लोकसेवा आयोगातर्फे भरण्यात याव्यात जेणेकरून महाविद्यालयात कार्यक्षम प्राचार्य मिळतील तसेच भाऊसाहेब नेने महाविद्यालयाच्या कारभाराबाबत नेमण्यात आलेल्या समिती ऐवजी एक वेगळी समन्वय समिती नेमण्यात यावी. समितीमध्ये एक प्राचार्य, एक शिक्षक, एक शिक्षकेत्तर कर्मचारी, एक शासनाचे नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी यांचा समावेश असावा असे सुचविले.

यानंतर मा. कुलगुरूंनी सन्माननीय सदस्य श्री. राजन कोळबेंकर यांना दुरूस्ती सुचना संक्षिप्त स्वरूपात सादरीकरण करण्याची विनंती केली.

श्री. राजन कोळबेंकर यांनी आपली दुरूस्ती सूचना मांडत 'आयडॉल' मध्ये शिबिरे, चर्चासत्रे आणि परिसंवाद यासाठी सहा लाखाची केलेली तरतूद कमी आहे त्यामध्ये वाढ करण्यात यावी, तसेच 'एमसीए' च्या प्रवेश प्रक्रियेत होणारा गोंधळ, एमसीए च्या विद्यार्थ्यांबरोबर गैरवर्तन करणारे अधिकारी तसेच क्रिकेट संघात खेळणारा श्री. विक्रांत आवटी यांच्या प्रथम सत्राच्या परीक्षा आणि आधीच्या परीक्षा एकत्र असल्यामुळे, श्री. विक्रांत आवटी यांची विशेष परीक्षा घेण्याच्या केलेल्या अर्जावर प्रलंबित असलेला निर्णय आदी मुद्दे सभेपुढे मांडले.

श्री. राजन कोळंबेकर यांच्या दुरूस्ती सुचनेस उत्तर देताना कुलगुरूंनी एमसीएच्या प्रवेश प्रक्रियेबाबत जी काही माहिती आपणाला संचालकांकडून पुरविण्यात आली आहे ती तपासण्यात येईल व ती चुकीची असल्यास त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल. विद्यार्थ्यांबरोबर गैरवर्तन करणा-या अधिका-यांना समज देण्यात येईल. तसेच पुढील वर्षाच्या एम.सी.ए. प्रवेशाच्या संदर्भामध्ये योग्य त्या प्राधिकरणांपुढे ठेऊन निर्णय घेण्यात येईल असे सांगितले. श्री. विक्रांत आवठी या खेळाडू बद्‌ल बोलताना मा. कुलगुरू पुढे म्हणाले की, तो खेळाडू छान खेळतो, परंतु परीक्षा विभागाकडून त्याच्या संबंधात कोणत्याही प्रकारचा असा निर्णय नाही. त्यामुळे त्याच्यासाठी वेगळया प्रक्रियेतून अशा विद्यार्थ्यांसाठी काय सोय करता येईल या संदर्भामध्ये चर्चा सुरू आहे.

श्री. राजन कोळंबेकर यांनी मा. कुलगुंरूच्या विनंतीनंतर त्यांच्या दुरूस्ती सूचना मागे घेतल्या.

यानंतर मा. कुलगुरूंनी सन्माननीय सदस्य श्री. प्रदिप सांवत यांना दुरूस्ती सूचना मांडण्याची विनंती केली.

श्री. प्रदिप सांवत यांनी दुरूस्ती सूचना मांडण्यापूर्वी दोन सूचना केल्या. १) विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक विद्यापीठाच्या कामासाठी ब-याच वेळा बाहेरगावी असल्यामुळे विद्यार्थ्यांना सांक्षाकित प्रमाणपत्राची प्रत करण्यासाठी थांबावे लागते, त्यासाठी त्यांच्या गैरहजेरीत एखादया अधिका-यास अधिकार दयावे. २) तक्रार निवारण समितीचे सदस्यसचिव यांना एक दिवस विद्यानगरी तर एक दिवस फोर्ट परिसर अशी कसरत करावी लागत असल्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या गैरहजेरीत तक्रार नोंदवता येत नाही. याबाबत आपण योग्य आदेश दयावेत.

सन्माननीय सदस्य श्री. प्रदिप सांवत यांनी स्पोर्टस कॉम्प्लेक्समधील स्विमींगपुलची दैनी अवस्था पाहताना त्यासाठी केलेल्या तीन कोटीच्या तरतुदीचा योग्य वापर करून क्रीडा संकुल अद्ययावत करण्यात यावे. आपल्याकडे पैसे उपलब्ध असून आपण का खर्च करत नाही, याबाबत प्रशासनाने खुलासा करावा असा आग्रह धरला.

मुंबई विद्यापीठामध्ये एक साडेचार कोटी रूपयांचा आंतरराष्ट्रीय दर्जाचा 'सिंथेटिक, अँथलेटिक्स ट्रॅक' मरिन ड्राईव्ह येथे तयार करण्यात येत आहे. तसेच क्रीडा संकुलामध्ये 'मॉपिन फ्लोरिंग' याची निविदा ठेकेदारांकडून मागविण्यात आली आहे. येणा-या सहा महिन्यामध्ये निविदा ओपन करून ठेकेदारांना आदेश देण्यात येतील. तसेच स्क्वॅशचे मैदान देखील होणार आहे. त्याचप्रमाणे स्विमींग टँकच्या संदर्भामध्ये आणि फिल्टरेशन प्लान्टच्या संदर्भामध्ये कामकाज होणार आहे. असा खुलासा कुलगुरूंनी केला.

श्री. प्रदिप सांवत यांनी मा. कुलगुरूच्या विनंतीनंतर त्यांच्या दुरूस्ती सूचना मागे घेतल्या.

यानंतर मा. कुलगुरूंनी सन्माननीय सदस्या डॉ. (श्रीमती) अनुपमा सावंत यांना त्यांच्या दुरूस्ती सूचना मांडण्यास विनंती केली.

डॉ. (श्रीमती) अनुपमा सावंत यांनी आपली दुरूस्ती सुचना मांडत होतकरू मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व आदिवासी भागातील अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती या संदर्भात अनुक्रमे २० लाख व ३० लाखाची तरतूद असताना सुध्दा ऑक्टोबर २०१२ पर्यंत त्याचा विनियोग का झाला नाही अशी विचारणा केली असता कुलसचिवांनी १०० टक्के विनियोग झाल्याची माहिती व या संदर्भात ऑक्टोबर नंतर झालेल्या बैठकीत निर्णय झाल्याची माहिती दिली.

परीक्षा विभागाच्या दुरूस्ती सुचनेबाबत बोलतांना डॉ. (श्रीमती) अनुपमा सावंत यांनी विचारणा केली की, इलेक्ट्रीकसिटीबाबत सुधारित अंदाजपत्रक ९५ लाखांचे असताना त्याची व्यवस्था बजेट इस्टीमेट जे फक्त १० लाख ४५ हजाराचे दाखविण्यात आले आहे, याबाबत संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, यांनी 'सोलर सिस्टीम' बसविण्यात येणार असल्यामुळे इलेक्ट्रीकसिटीवरील खर्च कमी होईल असे अपेक्षित आहे व 'सोलर सिस्टीम' बसविण्याबाबत निविदा मागविण्यात आल्या असून कार्यान्वित करण्याची प्रक्रिया सुरू असल्याबाबतची माहिती दिली.

परीक्षा विभागातील एवढा मान्यता व अमान्यता प्राप्त व हंगामी स्टाफ असताना व तंत्रज्ञानाचा वापर करूनसुध्दा निकाल जाहीर होण्यास लागणारा विलंब चिंतेची बाब असल्याचा मुद्दा मांडला. त्यांनी 'सेमिस्टर वन रिवाइज कोर्सचे' मूल्यांकन किती तारखेला पूर्ण झाले व निकाल किती दिवसानंतर लावण्यात आला. त्या तारखांची मागणी केली. निकाल मुल्याकंनामुळे उशिरा लागला असे प्रशासन उत्तर देत आहे. मुल्याकंन हे शिक्षकानी केले त्यामुळे निकाल शिक्षकांमुळे उशिरा लागला असा दोष शिक्षकांना दिला जातो. पण प्रत्यक्षात मूल्याकंनाचे काम शिक्षकांनी वेळेवर केले परंतु, विद्यापीठाने त्यानंतर निकाल लावण्यास विलंब हि केला ही वस्तुस्थिती आहे अशी नाराजी व्यक्त केली. डॉ. सुरेश उकरंडे यांनी मुल्याकंन प्रक्रिया न म्हणता एकूण निकाल प्रक्रियेला लागलेला कालावधी असे म्हणायला हवं असे मत चर्चेत भाग घेताना मांडले.

या वेळेस झालेल्या चर्चेत सन्माननीय सदस्य डॉ. बिंदूप्रकाश मिश्रा, डॉ. (श्रीमती) मोहसिना मुकादम डॉ. (श्रीमती) माधवी निकम, डॉ. (श्रीमती) मधू परांजपे, डॉ. वसंत शेकडे, डॉ. दिपक बोडवई, डॉ. जालिंदर अडसुळे आणि डॉ. अभय वैद्य यांनी सहभाग घेतला.

डॉ. (श्रीमती) अनुपमा सावंत यांनी मुल्याकंन पूर्ण झाल्याची तारीख व निकाल जाहीर केल्याची तारीख याबाबतची माहिती जोपर्यंत देत नाहीत तोपर्यंत दुरूस्ती सूचना मागे घेणार नाही अशी भूमिका घेतली. त्यानंतर मा. कुलगुरूंनीसुध्दा सर्व बाबी तपासून एका आठवडयात प्रश्नाच्या अनुषंगाने हवी असलेली सर्व माहिती देण्यात येईल असे आश्वासन दिले व दुरूस्ती सूचना मागे घेण्याची डॉ. (श्रीमती) अनुपमा सावंत यांना विनंती केली.

प्र-कुलगुरूंनी चर्चेच्या अनुषंगाने डॉ. (श्रीमती) अनुपमा सावंत यांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला व त्यांना दुरूस्ती सूचना मागे घेण्याची विनंती केली.

डॉ. (श्रीमती) मधू परांजपे आणि डॉ. जालिंदर अडसुळे यांनी दुरूस्ती सूचना मागे घेतली जाणार नाही अशी भूमिका घेत यासंदर्भात मतदान घेण्याची मागणी केली.

प्रा. अंबादास मोहिते, प्राचार्य मुरलीधर चांदेकर, प्राचार्या (श्रीमती) कमला बालसुब्रमन्यम् डॉ. मधू नायर, प्राचार्य नारायण राजाध्यक्ष या सन्माननीय सदस्यांनी सलोख्याचे वातावरण कायम ठेवण्याकरीता मा. कुलगुरूंच्या आश्वासन व आव्हानाला प्रतिसाद द्यावा व दुरूस्ती सूचना मागे घ्यावी अशी डॉ. (श्रीमती) अनुपमा सावंत यांना विनंती केली. मा. कुलगुरुंनी वांरवार विनंती करूनही डॉ.(श्रीमती) अनुपमा सावंत यांनी दुरूस्ती सूचना मागे न घेतल्यामुळे प्राचार्य नारायण राजाध्यक्ष यांनी सभेला दिलेल्या माहिती नुसार हात वर करून मतदान प्रक्रिया घेण्यात आली. डॉ. (श्रीमती) अनुपमा सावंत यांनी मांडलेली कट मोशन पास करायच्या बाजूनी १८ मते व पास करायची नाही च्या बाजूने ३७ मते पडल्यामुळे कट मोशन पास करायची नाही. असा सभागृहाचा निर्णय असल्याचे मा. कुलगुरूंनी जाहीर केले.

यानंतर मा. कुलगुरुंनी सन्माननीय सदस्य डॉ. बिंदूप्रकाश मिश्रा यांना त्यांच्या दुरूस्ती सूचना मांडण्यास विनंती केली.

डॉ. बिंदूप्रकाश मिश्रा यांनी परीक्षा विभागाच्या संदर्भात, प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका व बारकोडवर ऑक्टोबर, २०१२ पर्यंत रू. २,७०,००,०००/- (रूपये दोन कोटी सत्तर लाख) खर्च झाला आहे व मागील वर्षी रू. ४,५०,००,०००/- (रूपये चार कोटी पन्नास लाख) एवढा खर्च झाला होता. मग यावर्षी रूपये सहा कोटी प्रस्तावित का करण्यात आले आहेत. त्यांनी परीक्षेच्या इतर खर्चाकरीता मागीलवर्षी रू. २०,००,०००/- (रूपये वीस लाख) प्रस्तावित केले होते. मग यावर्षी फक्त १२ लाख का? अशी विचारणा केली. तसेच रसायनशास्त्र विभागातील शिष्यवृत्ती, फेलोशिप, अनुदान व अनुषंगिक खर्चाकरिता मागील वर्षी रू. ८,१६,०००/- एवढी तरतूद होती. यावर्षी ही रक्कम का कमी (रू. ७,६८,०००/-) करण्यात आली व मॉडेल कॉलेजकरिता मागील वर्षी काहीच निधी

प्रस्तावित नव्हता मात्र यावर्षी रू. १,००,०००/- कसे ठरविले याविषयी स्पष्टीकरण मागितले. कपात सूचनांच्या संदर्भात स्पष्टीकरण देताना संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांनी सेमिस्टर पद्धतीमुळे बारकोड उत्तरपत्रिकांची संख्या २२ ते २४ लाख आहे व प्रत्येक उत्तरपत्रिका रू. २५ ते २७ ला होईल त्यामुळे अंदाजित रक्कम जास्त दर्शविण्यात आली आहे. कलिना येथील परीक्षा व लेखा विभागाकरिता दोन वाहने खरेदीकरिता रू. १२ लाखाची तरतूद, रिसर्च फेलोंच्या फेलोशिपकरीता रू. ७,६८,०००/- ची तरतूद तसेच दोन मॉडेल महाविद्यायातील अतिथी व्याख्यात्यांच्या अनुषंगिक खर्चाकरिता रू. १,००,०००/- टोकन रक्कमेची तरतूद केल्याचा खुलासा केला.

या संदर्भातील चर्चेत भाग घेत असताना डॉ. अभय बांबोले यांनी बारकोड उत्तरपत्रिकेवरील खर्च कमी करण्याकरीता पर्यायी तंत्रज्ञानाचा वापर करावा असे सूचित केले असता सन्माननीय सदस्यांनी पर्याय सुचवावा तो परीक्षा मंडळाच्या बैठकीत ठेवण्यात येईल असे संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ यांनी सांगितले व दुरूस्ती सूचना मागे घेण्याची विनंती केली.

डॉ. विंदूप्रकाश मिश्रा यांनी संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ यांच्या विनंती नंतर दुरूस्ती सूचना मागे घेतल्या.

यानंतर मा. कुलगुरूंनी सन्माननीय सदस्या डॉ. (श्रीमती) संगीता गोडबोले यांना त्यांच्या दुरूस्ती सूचना मांडण्यास विनंती केली.

डॉ. (श्रीमती) संगीता गोडबोले यांनी एकत्रितपणे आपल्या दुरूस्ती सूचना मांडत क्रेडिट सिस्टीमच्या अनुषंगाने प्रथम व द्वितीय वर्षाचे निकाल लावताना येणा-या अडचणी, तृतीय वर्षाला क्रेडिट सिस्टीम लागू केल्यास अगोदरच जास्त काम असलेल्या शिक्षकांवर येणारा अतिरिक्त कार्यभार, प्रत्यक्ष इतर अध्यपकांच्या कामामूळे अध्यापनाचा कमी होत चाललेला वेळ, अंतर्गत मूल्यांकनाचे मार्क्स मिळावेत त्या तयारीकरीता विद्यार्थ्यांचे वर्गाकडे पाठ फिरविणे, आदी समस्याकडे लक्ष वेधले. तसेच त्यांनी काही महाविद्यालयात बाहय परीक्षकांऐवजी अंतर्गत परीक्षकांनी प्रात्याक्षिक परीक्षा घेतल्याचे तसेच सुपरवायझर्सना देण्यात येणा-या अन्य परिश्रमिकाचा, व सहपरीक्षा समन्वयकाचा मुद्दा उपस्थित केला व याबाबत योग्य कार्यवाहीची मागणी केली असता 'क्रेडिट सिस्टीमबाबत' परीक्षा मंडळापुढे बाब ठेवून निर्णय घेण्यात येईल असे संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ यांनी आश्वासन दिले.

त्यानंतर झालेल्या चर्चेत सन्माननीय सदस्य डॉ. (श्रीमती) मोहसिना मुकादम, डॉ. (श्रीमती) माधवी निकम, डॉ. (श्रीमती) सुनिता खारीवाल, डॉ. आदयप्रसाद पांडे, डॉ. प्रल्हाद पवार, श्री. संजय वैराळ, डॉ. (श्रीमती) कमला बालसुब्रमण्यम, प्राचार्य नारायण

राजाध्यक्ष, डॉ. विठ्ठल रोकडे, डॉ. (श्रीमती) मधू परांजपे यांनी 'क्रेडिट सिस्टीम', 'ज्वाईंट चीफ कंडकटर्स/एक्झामिनर्स' ची नियुक्ती, तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना क्रेडिट सिस्टीम लागू करणे, सुपरवायझर्सचे पारीश्रमिक, ऑनलाईन परीक्षा, 'टास्क फोर्स' समन्वयक नियुक्ती आदी मुद्दे उपस्थित करून वरील सर्व बाबींचा गांर्भीयाने विचार करण्याची विनंती केली. डॉ. विजय पवार यांनी ऑनलाईन परीक्षापध्दतीचे स्वागत केले.

ज्या ज्या वेळेला गुणवंत्तेच्या अनुषंगाने नाविन्यपूर्ण बाबींची सुरूवात होते त्या वेळेस येणा-या अडचणी/समस्यांबाबत चर्चा होणे स्वाभाविक बाब आहे, असे मत व्यक्त करून कुलगुरूंनी सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेले संबंधित मुद्दे विद्वत परिषदेत चर्चेला घेण्यात येतील तसेच ऑनलाईन ट्रान्समिशन, सुरक्षा विषयक मुद्दयाबाबत परीक्षा मंडळ निर्णय घेईल असे आश्वासन दिले.

डॉ. (श्रीमती) संगीता गोडबोले यांनी मा. कुलगुंरूच्या विनंतीनंतर त्यांच्या दुरूस्ती सूचना मागे घेतल्या.

यानंतर मा. कुलगुरूंनी सन्माननीय सदस्य डॉ. विवेक देशमुख यांना त्यांच्या दुरूस्ती सूचना मांडण्यास विनंती केली.

डॉ. विवेक देशमुख यांनी आपली दुरूस्ती सूचना मांडत विद्यापीठातील विविध विभागातील दस्तऐवजाची दैनी अवस्था लक्षात घेता बजेटमध्ये दुरूस्ती आणि साधनसामुग्रीसाठी केलेल्या तरतूदीचा विनीयोग होत नसेल तर तरतूद का केली जाते. तरतुदीचा विनियोग करून सुविधा पुरविल्या गेल्या पाहिजेत. शिक्षकांच्या मानधनात वाढ केली पाहिजे. स्कूल ऑफ इंजिनीअरिंग सबसेंटर, कल्याण यासाठी असलेल्या तरतुदीचा वापर व त्या अनुषगांने तशी प्रगती झालेली दिसत नाही. त्याचप्रमाणे इंजिनीअरिंग व सायन्स रिसर्चबाबत उच्चस्तरीय समिती नेमून नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याचे विद्यापीठाने ठरविले होते. याची आठवण करून देत याबाबत काय झाले अशी विचारणा केली.

आपण केलेल्या सूचनांचा विचार करून योग्य निर्णय घेण्यात येईल असे प्र-कुलगुरूंनी सांगितले.

डॉ. विवेक देशमुख यांनी प्र-कुलगुंरूच्या विनंतीनंतर त्यांच्या दुरूस्ती सूचना मागे घेतल्या.

यानंतर मा. कुलगुरूंनी सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत झोरे यांना त्यांच्या दुरूस्ती सूचना मांडण्यास विनंती केली.

श्री. शशिकांत झोरे यांनी आपली दुरूस्ती सूचना मांडत हंगामी सुरक्षारक्षकांना रूपये ६०००/- इतके कमी वेतन देण्यात येते, त्यात वाढ करण्यात यावी. तसेच हंगामी सुरक्षा रक्षकांबाबत दोन समित्यांचे अहवाल त्या अनुषगांने लवकरात लवकर विचार करावा. इंटरनॅशनल कनव्हेंस सेंटर, स्पोर्टस् कॉम्प्लेक्स मध्ये 'एसी' बसविण्याकरिता, शिक्षक भवनात फर्निचर आणि फिक्चरर्स तसेच विद्यानगरीमध्ये विद्यार्थी केंद्रासाठी आणि चर्चासत्रे, प्रकाशने, परिसंवाद इत्यादी साठी केलेल्या तरतूदीचा विनियोग का केला जात नाही.
त्याचप्रमाणे मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहली आणि इंडस्ट्रियल कॅम्पला भेट देण्यासाठी केलेली तरतूद कमी आहे त्यात वाढ करण्यात यावी आदी मुद्दयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर चर्चेत प्रा. नारायण राजाध्यक्ष यांनी सहभाग घेतला.

व्यवस्थापन परिषदेच्या नुकत्याच झालेल्या निर्णयानुसार हंगामी सुरक्षा रक्षकांना रूपये ८०००/- मासिक वेतन करण्यात आले असून हंगामी कर्मचा-यांना सेवेत सामावून घेण्यासाठी पुढील व्यवस्थापन परिषदेमध्ये सविस्तर चर्चा करून योग्य निर्णय घेण्यात येईल असा खुलासा प्र-कुलगुरूंनी केला.

श्री. शशिकांत झोरे यांनी प्र-कुलगुरूंच्या विनंतीनंतर त्यांच्या दुरूस्ती सूचना मागे घेतल्या.

यानंतर मा. कुलगुरूंनी सन्माननीय सदस्य डॉ. आदयप्रसाद पांडे यांना त्यांच्या दुरूस्ती सूचना मांडण्यास विनंती केली.

डॉ. आदयप्रसाद पांडे यांनी आपली दुरूस्ती सूचना मांडत शिक्षक होण्यासाठी असलेल्या पात्रतेपैकी नेट/सेट एक अंत्यत महत्वाची बाब असून विद्यापीठाने रेमिडीयल कोर्स साठी केलेली तरतूद अत्यंत कमी रूपये १,१००/- इतकी आहे, त्यात वाढ करण्यात यावी. तसेच आयडॉल मध्ये एक मार्गदर्शन केंद्र उघडण्यात यावे. त्याचप्रमाणे विद्यापीठ जगातील २०० मध्ये येण्यासाठी, रूपये ४,००,०००/- च्या केलेल्या तरतुदीत वाढ करण्यात यावी, विद्यापीठातील व महाविद्यालयातील शिक्षकांना आंतरराष्ट्रीय संशोधन, परिषदांमध्ये सादरीकरणासाठी केलेल्या तरतुदीतही वाढ करण्यात यावी असे सूचविले तसेच सदर चर्चेत श्री. संजय वैराळ यांनी भाग घेतला.

विद्यापीठ पहिल्या २०० मध्ये येण्यासाठी इंटरनल क्वॉलिटी इंशुरस सेलची निर्मिती करण्यात आली आहे, असे प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे म्हणाले.

डॉ. आदयप्रसाद पांडे यांनी प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांच्या विनंतीनंतर त्यांच्या दुरूस्ती सूचना मागे घेतल्या.

रेमिडीयल कोचिंग क्लासेस एसी/एसटी/मॉयनारटी/ओबीसी अशा चार वर्गातील विद्यार्थ्यांसाठी घेतले गेले तसेच प्रशासनाच्या परवानगीने विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात जे सिंधुदुर्ग, रायगड, रत्नागिरी, ठाणे आणि मुंबई याठिकाणच्या मायनॉरटी कॉलेज मध्ये प्रशिक्षण घेण्यात आले असा खुलासा प्रो. दिलीप पाटिल यांनी केला.

डॉ. बिंदूप्रकाश मिश्रा यांनी मागील अधिसभेत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने व्यक्तिमत्व विकास, मानसिक संतुलन, ई-टीव्ही लर्निंग विफी कनेक्टीव्हिटी, व्हिडीयो कॉनफर्सिंग आणि विद्यापीठ पहिल्या २०० मध्ये आणण्याच्या अनुषंगाने झालेल्या चर्चेबाबत आठवण करून देत त्याबाबत काय प्रगती झाली अशी विचारणा केली.

विद्यापीठाच्या काही सत्रातील विद्यार्थ्यांसाठी विनामूल्य मानसोपचार परीक्षांचे नियोजन करण्यात आले होते. तसेच १५ दिवसापूर्वी बी.ए. बी.कॉम. बी.एससी. च्या ६७ विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे. असा खुलासा डॉ. मृदुल निळे यांनी केला.

यानंतर मा. कुलगुरूंनी सन्माननीय सदस्य डॉ. संजय कुमार यांना त्यांच्या दुरूस्ती सूचना मांडण्यास विनंती केली.

डॉ. संजय कुमार यांनी आपली दुरूस्ती सूचना मांडताना इंजिनियरीग महाविद्यालयांना प्रश्नपत्रिका ई-मेल व्दारे पाठविण्यात येत आहे. तर बजेटमध्ये मोठया प्रमाणात केलेली तरतूद कमी करण्यात यावी, International Research Journal साठी केलेल्या तरतुदीचा विनीयोग मागील दोन वर्षे करण्यात आलेला नाही. Academy of Administrative Carrier च्या संचालकाच्या वेतनासाठी केलेल्या तरतुदीत वाढ करण्यात यावी, तसेच Nano Science आणि Nano Technology विभागात कायम स्वरूपी कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात यावी.

प्रश्नपत्रिका छपाईसाठी बजेट मध्ये केलेली तरतूद फक्त इंजिनीयरींगसाठी नसून विविध शाखेच्या अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका छापले जातात त्यासाठी बजेट मध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. International Research Journal साठी तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच Academy of Administrative Carrier च्या संचालकाचा अतिरिक्त कारभार डॉ. अंबादास जाधव यांच्याकडे दिल्यामुळे त्यांना मानधन देण्यात येते. भविष्यात नियमित संचालकाची नियुक्ती करण्यात येईल Nano Science आणि Nano Technology साठी कायम स्वरूपी संचालकांची नियुक्ती करण्यात आली आहे. असा खुलासा प्राचार्य डॉ. राजपाल हांडे यांनी केला.

डॉ. संजय कुमार यांनी प्राचार्य डॉ. राजपाल हांडे यांच्या विनंतीनंतर त्यांच्या दुरूस्ती सूचना मागे घेतल्या.

यानंतर मा. कुलगुरूंनी सन्माननीय सदस्या डॉ. (श्रीमती) अनुराधा मझुमदार यांना त्यांच्या दुरूस्ती सूचना मांडण्यास विनंती केली.

डॉ. (श्रीमती) अनुराधा मझुमदार यांनी त्यांची दुरूस्ती सूचना मांडत विद्यापीठाच्या प्रेस मधील कर्मचा-यांच्या पगारावर होणा-या आर्थिक खर्चावर प्रश्न उपस्थित केला तसेच तेथील कर्मचा-यांना प्रशिक्षित न करणे, अत्याधुनिक यंत्र सामुग्री नसणे तसेच आऊट सोर्सिंग या विषयावर आपले मत मांडले. मुलांचे कर्मवीर भाऊराव वसतिगृहामधील तसेच विद्यापीठातील वाणिज्य विभागातील दुरावस्थेबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. त्याचप्रमाणे बँक ऑफ इंडिया संबंधी निधीचा उपयोग न झाल्याबद्दल विद्यापीठातील आफ्रिकन स्टडीज, गुजराथी या विभागातील अपु-या विद्यार्थ्यांची संख्या, तसेच मराठी विभागातील पीएच.डी. स्कॉलरशिपसाठीचा न वापरलेला निधी याबद्दल खेद व्यक्त केला.

प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांनी मुलांच्या वसतिगृहामधील चालू असलेल्या दुरूस्ती बद्दल माहिती दिली तसेच विद्यापीठातील काही विभागातील अपु-या विद्यार्थी संख्याबद्दल चिंता व्यक्त केली. तसेच विद्यापीठातील प्रेसमध्ये सध्या १८८ कर्मचारी कार्यरत असून किती प्रमाणात काम आऊट सोर्सिंग होते याबद्दल माहिती आपणास कळविण्यात येईल असा खुलासा केला.

डॉ.(श्रीमती) अनुराधा मझुमदार यांनी प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांच्या विनंती नंतर त्यांच्या दुरूस्ती सूचना मागे घेतल्या.

मा. कुलगुरू यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. जालिंदर अडसुळे यांना त्यांच्या दुरूस्ती सूचना मांडण्यास विनंती केली.

डॉ. जालिंदर अडसुळे यांनी त्यांची दुरुस्ती सूचना मांडत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणारी स्कॉलरशिप ही भारत सरकारकडून देण्यात येते किंवा महाराष्ट्र शासनाकडून किंवा विद्यापीठाने त्यासाठी काही वेगळी तरतूद केलेली आहे का? याबाबत खुलासा करावा, जर भारत सरकारकडून देण्यात येत असल्यास बजेट मध्ये विद्यापीठाच्या नावावर का दाखविण्यात आली आहे. त्याच प्रमाणे पी.एचडी. प्रवेश प्रक्रियेत पास झालेल्या विद्यार्थ्यांना अजूनही गाईड का दिले जात नाही आणि केंद्रावर होणा-या पी.एचडी. प्रक्रिया संशय निर्माण करणा-या असतात, विद्यापीठाच्या नियमांचे पालन केले जात नाही आदी मुद्द्यावर सविस्तर चर्चा केली.

विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून स्कॉलरशिप दिली जाते, अर्थसंकल्पामधील पान क्र. १९ वरील दुरूस्तीचा खुलासा केलेला आहे. असे प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांनी सांगितले व डॉ. जालिंदर अडसुळे यांना त्यांची दुरूस्ती सूचना मागे घेण्यास विनंती केली.

डॉ. जालिंदर अडसुळे यानी प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांच्या विनंती नंतर त्यांच्या दुरूस्ती सूचना मागे घेतल्या.

यानंतर मा. कुलगुरूंनी सन्माननीय सदस्य श्री. संजय वैराळ यांना त्यांच्या दुरूस्ती सूचना मांडण्यास विनंती केली.

श्री. संजय वैराळ यांनी आपली दुरूस्ती सूचना मांडताना बहि:शाल शिक्षण केंद्राला विविध कार्यक्रमातून होणा-या उत्पनाचा विचार करता बहि:शाल शिक्षण केंद्रांची केलेली तरतूद जास्त केली आहे ती कमी करावी, समाजाला लागणा-या मनुष्यबळाचा विचार करून कोर्सेस तयार करण्याची गरज आहे, तसे केले जात नाही म्हणून अॅकेडमिक ऑडीट करण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे कायमस्वरूपी कर्मचा-यांना प्रशिक्षण देणे, दूरध्वनीवरील वाढलेला खर्च, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी बुकबँक सुविधा व्यवस्थितरित्या राबविल्या जात नाहीत. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या 'फायनशियल असिस्टंट' सुविधांचे नियोजन व्यवस्थित होत नाही, 'रेमिडीयल क्लासेस' फॉर नेट/सेट हे पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी आहे पदवीपूर्व अभ्यासक्रमासाठी नाही आणि त्यासाठी एक्सपर्ट शिक्षकांची गरज आहे. अधिसभा सदस्यांनी इतर विद्यापीठास भेट देण्यासाठी केल्या गेलेल्या तरतुदीत देखील शुन्य दाखविण्यात आलेल आहे. तसेच रेडिओ केंद्रांची फ्रिकवेन्सी वाढवली पाहिजे जेणेकरून विद्यापीठाच्या सर्व महाविद्यालयांना त्याचा उपभोग घेता येईल. पदव्युत्तर शिक्षकांना शिबीरे व परिषदांसाठी प्रवास अनुदान साहाय्य, ग्रंथालयाच्या इमारतीची दयनीय अवस्था, वसतीगृहातील विद्यार्थ्यांना इंटरनेटची सुविधा, तसेच वसतिगृहातील मेसच्या जेवणाचा दर्जा बरोबर नाही. मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसरातील जागेवर होणारे अतिक्रमण, अल्केश दिनेश मोदी संस्थेतील हॉलचा वापर लग्न, पार्टयांसाठी केला जातो त्याचे उत्पन्न विद्यापीठाला मिळते का? त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या 'इंडस्ट्रीयल टूर' का होत नाहीत? विभागप्रमुख तीन तीन वर्षांनी रोटेशनने का बदलले जात नाहीत? आदी मुद्द्यावर सविस्तर चर्चा केली.

आपण उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन प्र-कुलगुरूंनी दिले.

श्री. संजय वैराळ यांनी प्र-कुलगुरूच्या विनंती नंतर त्यांच्या दुरूस्ती सूचना मागे घेतल्या.

यानंतर मा. कुलगुरूंनी सन्माननीय सदस्या डॉ. (श्रीमती) आरती प्रसाद यांना त्यांच्या दुरूस्ती सूचना मांडण्यास विनंती केली.

डॉ. (श्रीमती) आरती प्रसाद यांनी आपली दुरूस्ती सूचना मांडताना शासन मान्य, अमान्य पदे, कर्मचा-यांची पेन्शन, तसेच रिक्त पदांमुळे कर्मचा-यांवर वाढलेला दबाव यामुळे त्यांच्या प्रकृतीवर होत असलेला परिणाम व त्यामुळे निर्माण होणारे आजारांचे प्रश्न विचारात घेत वैद्यकीय सवलतीसाठी केलेली तरतूद कमी आहे त्यात वाढ करण्याची गरज आहे. तसेच विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणा-या गुणवंत शिष्यवृत्तीसाठी केलेल्या ३,५०,०००/- रूपयाच्या तरतुदीचा विनीयोग व्यवस्थितरीत्या करण्याची गरज आहे. आदी मुद्द्यावर सविस्तर चर्चा केली. सदर चर्चेत डॉ. (श्रीमती) माधवी निकम यांनी सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणा-या गुणवंत शिष्यवृत्ती मध्ये वाढ करण्यासाठी विद्यापीठ स्तरावर प्रयत्न केले जातील, तसेच कर्मचा-यांचा मेडिकल संबधी, ग्रुप इंन्शुरन्स काढण्याचे काम सुरू आहे असा खुलासा प्र-कुलगुरूंनी केला.

डॉ. (श्रीमती) आरती प्रसाद यांनी प्र-कुलगुंरूच्या विनंती नंतर त्यांच्या दुरूस्ती सूचना मागे घेतल्या.

यानंतर मा. कुलगुरूंनी सन्माननीय सदस्य डॉ. अभय बांबोले यांना त्यांच्या दुरूस्ती सूचना मांडण्यास विनंती केली.

डॉ. अभय बांबोले यांनी आपली दुरूस्ती सूचना मांडताना बजेटमध्ये ब-याच महत्वाच्या हेड खाली तरतूद असतानाही त्याचा वापर केला जात नाही. उदा. फेलोशिप, फायनांशियल असिस्टंड, सेमीनार, परिषदासाठी देण्यात येणारी मदत यासाठी बजेटमध्ये केलेल्या तरतूदीचा वापर योग्य रित्या केल्यास विद्यापीठ नक्कीच पहिल्या दोनशे मध्ये येईल. वरील स्कीम राबविताना ब-याच वेळा विद्यापीठाच्या वित्त विभागाकडून होणा-या जाचकपणामूळे विभागप्रमुखांमध्ये नाराजीचे वातावरण असते याबाबत आपल्याला काळजी घेतली पाहिजे, तसेच विद्यापीठाची ऐतिहासिक इमारत व विद्यार्थी भवनाची दैयनीय अवस्था याबाबत विद्यापीठाने योग्य पाऊले उचलावीत. विद्यापीठातील मागासवर्गीय पी.एचडी. धारक विद्यार्थ्यांची संख्या पाहता विद्यापीठ विभागातील मार्गदर्शकांची मागासवर्गीय विद्यार्थ्यांबाबत सकारात्मक भूमिका नसते. आदी मुद्दे मांडत नाराजी व्यक्त केली.

डॉ. अभय बांबोले यांनी प्र-कुलगुंरूच्या विनंती नंतर त्यांच्या दुरूस्ती सूचना मागे घेतल्या.

**बाब क्र. ४ : मे. शरद एस्.गायकवाड आणि कं., मुंबई विद्यापीठाचे सांविधिक लेखा परीक्षा यांनी सादर केलेले मुंबई विद्यापीठाचे सन २०१०-२०११ चे वार्षिक लेखे व ३१ मार्च, २०११ चे ताळेबंद आणि त्यावरील लेखापरीक्षण अहवाल अधिसभेच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर.**

मे. शरद एस्. गायकवाड आणि कं, सांविधिक लेखा परिक्षक यांनी सादर केलेले मुंबई विद्यापीठाचे सन २०१०-२०११ चे वार्षिक लेखे आणि ३१ मार्च, २०११ चे ताळेबंद, लेखापरिक्षण अहवाल व त्यावरील व्यवस्थापन परिषदेने दिलेली स्पष्टीकरणे.

प्राचार्य डॉ. राजपाल हांडे, संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ यांना व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीनुसार खालील प्रस्ताव अधिसभेपुढे विचारार्थ व स्विकृतीसाठी मांडण्याची पूर्वसूचना दिली आहे.

(१) "महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम २६(२) अन्वये विद्यापीठाचा सन २०१०-११ चे वार्षिक लेखे, आणि ३१ मार्च, २०११ चा ताळेबंद."

(२) "मे. शरद एस्. गायकवाड आणि कंपनी, सांविधिक लेखा परिक्षक यांचा सन २०१०-११ या वर्षा चा वार्षिक लेख्यासंबंधीचा लेखा परिक्षण अहवाल" त्यात उपस्थित केलेल्या मुद्दयांना व्यवस्थापन परिषदेने दिलेल्या स्पष्टीकरणे."

(३) "सन २०१०-२०११ या वर्षाच्या वार्षिक लेख्यांमध्ये 'परिशिष्ट १' पृष्ठ क्र.३८४ ते ३९६ व 'परिशिष्ट २' पृष्ठ क्र.३९७ ते ३९८ मध्ये दर्शविलेल्या सुधारीत अंदाजापेक्षा जादा झालेल्या खर्चाला मान्यता"

(टिप: वित्त व लेखा समितीच्या दि.१३ फेब्रुवारी, २०१३ (बाब क्र.८) रोजी संपन्न झालेल्या सभेत विद्यापीठाचा सन २०१०-२०११ चे वार्षिक लेखे आणि ३१ मार्च, २०११ चा ताळेबंद व मे. शरद एस्. गायकवाड आणि कंपनी, सांविधिक लेखा परिक्षक यांचा लेखा परिक्षण अहवाल व त्यात उपस्थित केलेल्या मुद्दयांना वित्त व लेखा समितीने दिलेल्या स्पष्टीकरणांसह मंजूर करण्याची व अधिसभेच्या अंतिम मान्यतेसाठी सादर करण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली. व्यवस्थापन परिषदेच्या दि. २२ फेब्रुवारी, २०१३ (बाब क्र.२) रोजी झालेल्या सभेत वित्त व लेखा समितीच्या शिफारशी मान्य करण्यात आल्या. विद्यापीठाचा सन २०१०-११ चे वार्षिक लेखे, ३१ मार्च, २०११ चे ताळेबंद व मे. शरद एस्. गायकवाड आणि कंपनी यांचा तदसंबंधीचा लेखा परिक्षण अहवाल त्यात उपस्थित केलेल्या मुद्दयांना व्यवस्थापन परिषदेने दिलेल्या स्पष्टीकरणांसह अधिसभेपुढे अंतिम मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहे.)

मे. शरद एस्.गायकवाड आणि कं. यांनी सादर केलेले मुंबई विद्यापीठाचे सन २०१०-२०११ चे वार्षिक लेखे आणि ३१ मार्च, २०११ चे ताळेबंद व लेखापरिक्षण अहवालावरील व्यवस्थापन परिषदेने दिलेली स्पष्टीकरणे व सन २०१०-२०११ या वर्षाच्या वार्षिक लेख्यांमध्ये 'परिशिष्ट १' पृष्ठ क्र.३८४ ते ३९६ व 'परिशिष्ट २' पृष्ठ क्र.३९७ ते ३९८ मध्ये दर्शविलेल्या सुधारीत अंदाजापेक्षा जादा झालेल्या खर्चाला मान्यतेसाठी अधिसभेच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

या विषयावर कोणत्याही सदस्यांनी दुरूस्ती सूचना मांडली नसल्याने सदर बाबीवर चर्चा करून मान्य करावी अशी विनंती मा. कुलगुरूंनी केली.

या नंतर कुलगुरूंनी घोषीत केले की, मे. शरद एस्. गायकवाड आणि कं., मुंबई विद्यापीठाचे सांविधिक लेखा परिक्षक यांनी सादर केलेले मुंबई विद्यापीठाचे सन २०१०–२०११ चे वार्षिक लेखे व ३१ मार्च, २०११ चे ताळेबंद आणि त्यावरील लेखापरीक्षण अहवाल मंजूर करण्यात आले.

**बाब क्र. ५ :** महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४, कलम १०४ व सुधारित कलम १०४(२) नुसार व्यवस्थापन परिषदेने तयार केलेल्या विद्यापीठाच्या २०११–२०१२ च्या वर्षवृत्ताला मान्यता देण्याविषयीचा प्रस्ताव.

प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे, संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ यांनी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४, कलम १०४ व सुधारित कलम १०४(२) नुसार व्यवस्थापन परिषदेने तयार केलेल्या विद्यापीठाचे २०११–२०१२ चे वर्षवृत्त कालावधी : १ एप्रिल, २०११ ते ३१ मार्च, २०१२ आधिसभेने मान्य करावे अशी विनंती केली.

त्यानंतर कुलसचिवांनी घोषित केले की, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४, कलम १०४ व सुधारित कलम १०४(२) नुसार व्यवस्थापन परिषदेने तयार केलेल्या विद्यापीठाच्या २०११–२०१२चे वर्षवृत्त अधिसभेने सर्वानुमते मान्य करण्यात आले.

सभेची सांगता राष्ट्रगीताने झाली.

मुंबई – ४०० ०३२
२३ सप्टेंबर, २०१३

कुलसचिव
( मुंबई विद्यापीठ )